



दैनिक
# युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता

Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com

तिकीट न लावण्याचा पोष्ट परवाना : WPP - 264 ◆ RNI No. MAHMAR/2007/24252 ◆ पोष्टाचा परवाना क्रमांक BII/RNP/SRP/25/2023-25




वर्ष १९ वे । अहिल्यानगर । अंक ८० । किंमत - ४ रू संपादिका - सुशीला किसन हासे (बी.ए.) । संस्थापक - किसन भाऊ हासे (बी.जे.) ९८२२०३९४६० । कार्य. संपादक - सुदीप किसन हासे (एम.ई.कॉम्प.) गुरूवार । ०२/०४/२०२६ । पान - ६




# आमदार खताळ यांना धक्का

## थोरातांच्या याचिकेवर उच्च न्यायालयात होणार सुनावणी



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर -शिवसेना (एकनाथ शिंदे) गटाचे आमदार अमोल खताळ यांना मोठा धक्का बसला असून, बाळासाहेब थोरात यांनी दाखल केलेली निवडणूक याचिका फेटाळण्याची त्यांची मागणी मुंबई उच्च न्यायालयाने फेटाळली आहे. त्यामुळे या प्रकरणाची सुनावणी पुढे सुरू ठेवण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाचे न्यायमूर्ती किशोर संत यांच्या खंडपीठासमोर हा निर्णय देण्यात आला. न्यायालयाने खताळ यांचा अर्ज नामंजूर करत, थोरात यांच्या निवडणूक याचिकेवर पुढील सुनावणी घेण्यास परवानगी दिली. या प्रकरणाची पुढील सुनावणी ७ मे रोजी होणार आहे.

या याचिकेत थोरात यांनी २१७-संगमनेर विधानसभा मतदारसंघातील २३ नोव्हेंबर २०२४ रोजी घोषित झालेल्या निकालावर आक्षेप घेतला आहे. त्यांनी लोकप्रतिनिधित्व कायद्याच्या कलम १००(१)(ब), १००(१)(ड)(ळ) आणि १००(१)(ड)(आयव्ही) अंतर्गत खताळ यांची निवडणूक अवैध ठरवण्याची मागणी केली आहे. तसेच, कलम १०१(ब) अंतर्गत स्वतःला निवडून आलेले घोषित करण्याची मागणीही केली आहे.

थोरात यांच्या याचिकेनुसार, खताळ यांनी आपल्या निवडणूक प्रतिज्ञापत्रात उत्पन्नाचा स्रोत व कर थकबाकीबाबतची माहिती लपवली. ‘नीलकमल’ नावाच्या फर्ममध्ये भागीदारी असूनही ती माहिती जाहीर न केल्याचा आरोप करण्यात आला आहे. जीएसटी विभागाच्या नोंदीनुसार संबंधित फर्मवर सुमारे २५ हजार रुपयांची थकबाकी असून, व्याजासह ती रक्कम ५४ हजार ६५० रुपयांपर्यंत गेल्याचा दावा करण्यात आला आहे.यावर बचाव करताना खताळ यांनी आपण त्या फर्मचे सध्याचे भागीदार नसून, फर्म विसर्जित झाल्याचे सांगितले. मात्र, न्यायालयाने जीएसटी संकेतस्थळावरील कागदपत्रांचा दाखला देत फर्म अद्याप सक्रिय असल्याचे प्राथमिक निरीक्षण नोंदवले. त्यामुळे या टप्प्यावर खताळ यांचा बचाव ग्राह्य धरता येणार नाही, असे स्पष्ट करण्यात आले.

प्रथमदर्शनी पाहता, लोकप्रतिनिधित्व कायद्याच्या कलम १००(१)(ब) मधील तरतुदी या प्रकरणात लागू होतात, असे न्यायालयाने नमूद केले. दरम्यान, राज्यातील विधानसभा व लोकसभा निवडणुकांनंतर दाखल झालेल्या अनेक निवडणूक याचिका प्रारंभीच फेटाळण्यात आल्या होत्या. मात्र, या प्रकरणात न्यायालयाने सुनावणी पुढे नेण्याचा निर्णय घेतल्याने राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले आहे.

# तालुक्यात तीन हजार हेक्टर शेती 'अवकाळी'मुळे बाधित

## १५ गावांत मोठ्या नुकसानीचा अंदाज



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर- संगमनेर तालुक्यात रविवार, सोमवार दोन दिवस झालेल्या अवकाळी पावसाने पिकांचे मोठे नुकसान झाले. सरासरी १५ गावातील अंदाजे ४ हजार ५९१ नुकसानग्रस्त शेतकऱ्यांचा समावेश असून प्राथमिक अंदाजानुसार ३ हजार १७७.१६ हेक्टर क्षेत्रावरील पिकाचे नुकसान झाल्याची प्राथमिक माहिती तालुका कृषी अधिकारी रेजा बोडके यांनी दिली.

संगमनेर तालुक्यात रविवार (दि.२९) व सोमवार (दि.३०) रोजी अवकाळी पावसाने अनेक भागात पिकांचे मोठे नुकसान केले. अवकाळी पावसा बरोबर वादळी वाऱ्याने घरांचे गोठ्यांचे पत्रे उडाले. दोन दिवस सायंकाळच्या सुमारास झालेल्या या अवकाळी पावसाने शेतकऱ्यांच्या शेतातील उभ्या पिकांचे नुकसान झाले. सध्या शेतात कांदा, मका, गहु इतर भाजीपाला पिका बरोबर डांळीब फळाचा समावेश आहे. कृषी विभागाच्या प्राथमिक अंदाजा नुसार धांदरफळ खुर्द, धांदरफळ बुद्रुक, निमगाव भोजापूर, मंगळापुर, निमज, पेमगिरी, निमगाव खुर्द निमगाव बुद्रुक वडगाव लांडगा, राजापूर, चिखली, चिकणी, सायखिंडी, वडगाव लांडगा इतर गावातील पिकांचा समावेश आहे. दोन दिवस झालेल्या नुकसानीचे वेगवेगळे पंचनामे करण्यात आले आहे. रविवारी अवकाळी पावसाने अंदाजे १००६.५० हेक्टर वरील पिकांचे नुकसान झाले. तर अंदाजे २ हजार ४८५ नुकसानग्रस्त शेतकऱ्यांचा समावेश आहे. तर सोमवारी पुन्हा अवकाळी पावसाने हजेरी लावली.

या भागाचे पंचनामे करण्यात आले असून प्राथमिक अंदाजा नुसार २ हजार १७०.९६ हेक्टर वरील पिकांचे नुकसान झाले आहे. तर २ हजार १०६ नुकसानग्रस्त शेतकऱ्यांचा समावेश आहे. दोन दिवस झालेल्या अवकाळी पावसाने ३१७७.४६ हेक्टर वरील पिकांचे नुकसान झाले. तर ४५९१ नुकसानग्रस्त शेतकऱ्यांचा समावेश आहे. कृषी विभागाचे हे सर्व प्राथमिक अंदाज असल्याचे तालुका कृषी अधिकारी बोडके यांनी सांगितले. हा अहवाल महसूल विभागाला सादर केला जाणार आहे. काही दिवसापूर्वी पाठर भागातही गारपिटीने पिकांचे नुकसान झाले होते. आता पुन्हा अवकाळी पावसाने पिकांबरोबर घराचे व मोठ्यांचे नुकसान झाल्याने शासनाने तातडीने मदत करावी अशी मागणी नुकसानग्रस्त शेतकऱ्यांनी केली आहे.

# नाशिक येथे अंधश्रद्धाविरोधी राज्य परिषद; विवेकी समाजासाठी एकत्र या

युवावार्ता (प्रतिनिधी)

नाशिक - विवेक जागर संस्था, शहीद डॉ. नरेंद्र दाभोलकर यांनी स्थापन केलेल्या महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती (अंनिस) तर्फे फलज्योतिष आणि बुवाबाजी विरोधी संघर्ष राज्य परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. ही परिषद शुक्रवार, दि. ३ एप्रिल २०२६ रोजी सकाळी ९.३० वाजता नाशिक येथील सिटू कामगार भवन, खुटवड नगर येथे होणार आहे.

परिषदेच्या उद्घाटन सत्रात राज्य कार्याध्यक्ष संजय बनसोडे भूमिका मांडणार असून, उद्घाटक म्हणून खासदार वर्षाताई गायकवाड मार्गदर्शन करणार आहेत. तसेच नाशिकचे मा. कॉ. डी. एल. कराड यांचे मनोगत होणार आहे. दुसऱ्या सत्रात ऐसे कैसे झाले भोंदू या विषयावर इस्लामपूर येथील प्राचार्य डॉ. नितीन शिंदे मार्गदर्शन करतील. या सत्राच्या अध्यक्षस्थानी सोलापूरचे दादा चांदणे राहणार आहेत.

तिसऱ्या सत्रात बुवाबाजी विरोधी संघर्ष : गुन्हे, तपास, कायदा व मनस्वास्थ्य या विषयावर निवृत्त सहाय्यक पोलीस आयुक्त बाबासाहेब बुधवंत, संगमनेरच्या अँड. रंजना



गवांदे आणि नाशिकचे मनोविकार तज्ज्ञ डॉ. जयंत ढाके मार्गदर्शन करणार आहेत.

परिषदेचा समारोप बुवाबाजी विरोधी निर्धार रॅलीने होणार असून, यात अंनिसचे राज्य उपाध्यक्ष उत्तम कांबळे मार्गदर्शन करतील. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी लातूरचे राज्य अध्यक्ष माधव बावगे असतील.

विवेकी समाज निर्मितीसाठी कार्य करणाऱ्या सर्व कार्यकर्ते, नागरिक आणि विचारवंतांनी या परिषदेस उपस्थित राहण्याचे आवाहन आयोजकांनी केले आहे.




# नव्या आर्थिक वर्षात गॅसचा भडका

## व्यावसायिक सिलेंडर ३१० रुपयांनी महागला

मुंबई (वृत्तसंस्था)

नव्या आर्थिक वर्षाच्या पहिल्याच दिवशी व्यावसायिक गॅस सिलिंडरच्या दरात मोठी वाढ झाली आहे. सरकारी पेट्रोलियम कंपन्यांनी १९ किलो वजनाचा एलजीपी सिलिंडरच्या किंमतीमध्ये ३१० रूपयांची वाढ केली आहे. सलग चौथ्या महिन्यात व्यावसायिक गॅस सिलिंडरच्या दरात वाढ झाल्याने हॉटेल-रेस्टॉरंटमधील जेवण महागण्याची चिन्हे आहेत. आधीच गॅस टचांईने त्रस्त नागरिकांना आता दरवाढीचा फटकाही बसणार आहे. दरम्यान, घरगुती एलपीजी सिलिंडर आणि विमान इंधनाच्या म्हणजेच एटीएफच्या दरात कोणतीही वाढ झालेली नाही.

महिनाभरापासून इराण-इस्त्रायल यांच्यामध्ये युद्ध सुरू आहे, त्यामुळे जगभरात महागाईचा भडका वाढलेला आहे. त्यातच आता १९ किलो वजनाच्या एलपीजी



सिलिंडरच्या दरात पुन्हा एकदा मोठी वाढ झाली आहे. आयओसी, एचपीसीएल आणि बीपीसीएल यांसारख्या सरकारी तेल कंपन्यांनी आजपासून १९ किलोच्या व्यावसायिक सिलिंडरच्या दरात वाढ केली आहे. दिलासादायक म्हणजे, १४.२ किलोच्या घरगुती एलपीजी सिलिंडरच्या दरात कोणतीही वाढ झालेली नाही. घरगुती एलपीजी सिलिंडरच्या दरात ७ मार्च रोजी वाढ करण्यात आली होती.

इंडियन ऑइल हिंदुस्तान पेट्रोलियम आणि भारत पेट्रोलियम यांनी आज १९ किलो वजनाच्या एलपीजी सिलिंडरच्या दरात तब्बल ३१० रुपयांची वाढ केली आहे. आर्थिक राजधानी मुंबईमध्ये आता गॅस सिलिंडरची किंमत २,०३१ रूपये झाली आहे. तर राजधानी दिल्लीत या सिलिंडर २०७८.५० रुपयांना मिळणार आहे. राजधानी दिल्लीमध्ये गॅस सिलिंडरची किंमत आधी १७६८.५० रुपये होती. नवीन दर आजपासून लागू झाले आहेत. इंडियन ऑइल कॉर्पोरेशनच्या वेबसाइटनुसार, नवी दिल्लीत १९ किलोच्या व्यावसायिक गॅस सिलेंडरची किंमत २,०७८.५० झाली आहे. कोलकातामध्ये २,२०८.०० तर चेन्नईमध्ये गॅस सिलिंडर २,२४६.५० रूपयांना मिळणार आहे. व्यावसाकिय गॅस सिलिंडरच्या किंमतीमध्ये सलग चौथ्या महिन्यात वाढ झाली आहे. याआधी १ मार्च रोजी सिलिंडरच्या दरात २८ रुपयांची वाढ झाली होती. १ फेब्रुवारीपासून ४९ रुपयांची तर १ जानेवारीपासून १११ रुपयांची वाढ झाली होती. म्हणजेच २०२६ वर्षातील पहिल्या चार महिन्यांत व्यावसायिक गॅस सिलिंडरची किंमत ४९८ रुपयांनी वाढली आहे. घरगुती एलपीजी सिलिंडरच्या दरात कोणतीही वाढ नोंदवण्यात आलेली नाही. ७ मार्च रोजी ६० रूपयांची वाढ करण्यात आली होती. आज हे दर स्थिर आहेत.









# मध्य महाराष्ट्रात वादळी पावसाचा इशारा

## नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन

मुंबई (जिल्हा माहिती अधिकारी)- भारतीय हवामान विभागाच्या ३० मार्च २०२६ रोजीच्या पाच दिवसीय अंदाजानुसार, मध्य महाराष्ट्रासह राज्यातील अनेक जिल्ह्यांमध्ये वीज चमकणे, गारपीट आणि वादळी पावसाचा इशारा देण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर नागरिकांनी आवश्यक ती खबरदारी घेण्याचे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

हवामान विभागाने दिलेल्या सूचनांनुसार, विजेचा कडकडाट ऐकू आल्यास तात्काळ घरात किंवा सुरक्षित ठिकाणी आश्रय घ्यावा. झाडाखाली, शेतात, पाण्याजवळ किंवा लोखंडी वस्तूंच्या जवळ उभे राहणे टाळावे. मोकळ्या जागेत मोबाईल फोनचा वापर करू नये. तसेच निवाऱ्यापासून दूर असल्यास जमिनीवर न पडता पाय एकत्र करून बसून राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

ग्रामपंचायत, पोलीस आणि आरोग्य विभागामार्फत तातडीने जनजागृती करण्याच्या सूचना प्रशासनाने दिल्या आहेत. रुग्णवाहिका व अग्निशमन दल सतर्क ठेवण्यात यावेत, तसेच शाळा, सभागृहे व सार्वजनिक इमारती सुरक्षित आश्रयस्थळ म्हणून खुले ठेवण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. हवामान खात्याचे अद्ययावत संदेश गावपातळीपर्यंत पोहोचवण्यावरही भर देण्यात आला आहे.

शेतकरी बांधवांनी विजेच्या इशाऱ्याच्या काळात शेतातील कामे टाळावीत, बांधकाम स्थळांवरील कामकाज तात्पुरते थांबवावे, तसेच यात्रास्थळे व मोठ्या जमावाचे कार्यक्रम तातडीने स्थगित करण्याचे आवाहन प्रशासनाने केले आहे, असे राज्य आपत्कालीन कार्य केंद्राच्या वतीने कळविण्यात आले आहे.

# ज्ञानमाता विद्यालयाच्या परिसरात पक्ष्यांसाठी 'पाणवठा'

## उन्हाच्या तीव्रतेत विद्यार्थ्यांनी जपली माणुसकी

संगमनेर (युवावार्ता प्रतिनिधी)- वाढत्या उन्हाची तीव्रता आणि रखरखत्या उन्हामुळे मानवासोबतच पशू-पक्षीही हैराण झाले आहेत. हीच बाब ओळखून निसर्गप्रेमी विद्यार्थ्यांनी सामाजिक बांधिलकी जपत ज्ञानमाता विद्यालयाच्या परिसरात पक्ष्यांसाठी दाणा-पाणी आणि निवाऱ्याची सोय केली आहे. विद्यार्थ्यांनी स्वतः एक मूठ धान्य, पक्ष्यांसाठी संकलित केले, व पक्ष्यांसाठी बनविण्यात आलेल्या घरट्यांमध्ये उपलब्ध करून दिले.



या उपक्रमामुळे सकाळच्या वेळी मोठ्या प्रमाणात कृत्रिम घरट्यांजवळ व पाणवठ्याजवळ दाणे खाण्यासाठी चिमण्यांची लगबग दिसत आहे, आणि त्यांचा चिवचिवाट ऐकू येतो. यामुळे सर्वांना आनंद होत आहे. विद्यार्थ्यांच्या या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

विद्यार्थ्यांच्या या उपक्रमाला शाळेतील शिक्षकांचे मोलाचे मार्गदर्शन, तसेच सामाजिक वनीकरण विभागातील सौ. खेमनर मॅडम यांचे विशेष सहकार्य लाभले. केवळ पुस्तकी शिक्षण न घेता निसर्गाशी नाते कसे जोडावे, याचा आदर्शच या विद्यार्थ्यांनी घालून दिला आहे. प्रत्येक विद्यार्थ्याने आपल्या घराबाहेर किंवा बाल्कनीत पक्ष्यांसाठी एक पाण्याचे भांडे ठेवावे, असे आवाहन यावेळी करण्यात आले.

या स्तुत्य उपक्रमामुळे ज्ञानमाता विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी प्राणिमात्रांवर दया करण्याचा आणि पर्यावरण रक्षणाचा एक नवा वस्तुपाठच समाजासमोर ठेवला आहे. सदर उपक्रमास विद्यालयाचे प्राचार्य फादर फ्रान्सिस पटेकर, उपप्राचार्या अर्चना डोंगरे, पर्यवेक्षक फादर प्रशांत, प्रा. सौ. शारदा नवले, व पर्यावरण समितीने विद्यार्थ्यांच्या उपक्रमाचे कौतुक केले आहे.

सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात अमृतवाहिनी सह. बँक लि. घुलेवाडी

आर्थिक अडचण आहे का?
काळजी करु नका !
सोनेतारण कर्ज
कमीत कमी व्याजदर
जास्तीत जास्त कर्ज
बँकेच्या विविध सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी आजच आपल्या जवळच्या शाखेशी संपर्क साधावा.
SMBT BANK
* कर्ज रक्कम वाढ । * कर्ज व्याजदर कमी । * कमीत कमी कागदपत्रे
सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी जवळच्या शाखेशी संपर्क साधा
- शाखा - घुलेवाडी (मुख्यशाखा), मार्केट यार्ड, इंजि. कॉलेज विस्तार कक्ष, मेनरोड, तळेगाव, साकूर, घारगाव, आश्वी बु।।, संगमनेर खुर्द, निमोण, राहाता

# चाकूहल्ल्यातील खुनाच्या आरोपीला जन्मठेप

## मुख्यमंत्र्यांच्या ९५% उद्दिष्टाच्या दिशेने संगमनेरचे पाऊल

**संगमनेर (युवावार्ता प्रतिनिधी)–** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी परवाच वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांशी बैठकीनंतर माध्यमांशी बोलताना एक महत्त्वाचे उद्दिष्ट जाहीर केले होते की, राज्यातील गुन्हा सिद्ध होण्याचे प्रमाण (कन्विक्शन रेट) सध्याच्या केवळ ५०% वरून थेट ९५% वर न्यायचे आहे. या घोषणेचे पडसाद अजून विरले नाहीत, तोच संगमनेर जिल्हा सत्र न्यायालयातून आलेल्या एका निकालाने या उद्दिष्टाची दिशा किती योग्य आहे, हे अधोरेखित केले आहे.

सोमवारी, दि. ३० मार्च २०२६ रोजी जिल्हा सत्र न्यायालयात संगमनेर तालुक्यातील वडगावपान येथील चाकूहल्ल्याच्या खुनाच्या खटल्याची सुनावणी झाली. सरकारी वकील जयंत दिवटे यांचा युक्तिवाद आणि सबळ पुरावे यांच्या आधारे जिल्हा सत्र न्यायाधीश व्ही. बी. गव्हाणे यांनी मुख्य आरोपी राहुल देविदास काळे यास जन्मठेप व वीस हजार रुपयांचा दंड, देविदास हरिभाऊ काळे यास दहा वर्षे साधी कैद व सोळा हजार रुपये दंड, तर रामनाथ सावित्रा गायकवाड यास दहा वर्षे सक्तमजुरी व सोळा हजार रुपयांच्या दंडाची शिक्षा ठोठावली आहे.

एका भांडणातून झालेली निर्घृण हत्या - घटना काय होती? - संगमनेर तालुक्यातील वडगावपान येथे रविवारी दि. २१ जून २०२० रोजी देविदास हरिभाऊ काळे याच्यासह अन्य एका महिलेसोबत प्रविण बाळासाहेब चत्तर यांच्या कुटुंबाशी शाब्दिक चकमक व मारामारी झाली. प्रतिक चत्तर हा काळे यांना समजून सांगत असताना काळे याने त्याच्या हातातील दगड त्यास फेकून मारला. त्यामुळे प्रतिकच्या डोक्याला लागले होते. काळे याने त्याचवेळी बाळासाहेब चत्तर यास ठार मारण्याची धमकी दिली होती. याबाबत पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केल्याचा राग मनात धरून आरोपींनी दुसऱ्याच दिवशी सूड उगवला आणि एका निरपराध माणसाचा जीव गेला. सोमवारी २२ जून रोजी राहुल देविदास काळे, देविदास हरिभाऊ काळे व रामनाथ सावित्रा गायकवाड यांनी चत्तर यांच्या चिकन शॉपवर जाऊन शिवीगाळ व दमदाटी सुरू केली. राहुल काळे याने हातातील चाकूने बाळासाहेब चत्तर यांच्या पोटात व छातीत खुपसत त्यांची हत्या केली. तसेच त्यांचा मुलगा प्रतिक याच्या दंडावर आणि पाठीवर वार करून घटनास्थळाहून पळ काढला.



पळाला, जेलही फोडली, पण पोलीस मागे लागले! - सहाय्यक पोलीस निरीक्षक पप्पु कादरी यांनी आरोपीस तात्काळ अटक केली होती. पोलीस उपअधीक्षक रोशन पंडीत यांनी घटनास्थळी धाव घेऊन तपासी अधिकाऱ्यांना मार्गदर्शन केले. पोलिसांनी पुणे, नाशिक, नगर, औरंगाबाद अशा विविध जिल्ह्यांत त्याचा शोध घेण्यासाठी फिल्डिंग लावली. मात्र पप्पु कादरी यांना एक धागा सापडताच त्यांनी आरोपी राहुल काळे यास नगर येथून अटक केली.

इतक्यावरच हे थांबले नाही. राहुल काळे हा गंभीर गुन्ह्यातील आरोपी असूनही त्याच्या मित्रांनी त्यास आश्रय दिला. राहुल काळे याची गुन्हेगारी पार्श्वभूमी होती, त्यामुळे गावात दहशत होती. ही दहशत मोडीत काढण्यासाठी पोलीस उपअधीक्षक रोशन पंडीत यांनी त्यास बेड्या ठोकून गावातून फिरवण्याचे ठरवले. त्यामुळे नागरिकांनी पोलिसांचे कौतुक केले होते. पुढे जाऊन शिक्षा लागेल या भीतीपोटी आरोपी सराईत गुन्हेगारांसोबत जेल तोडून पसार झाला होता. परंतु स्थानिक गुन्हे शाखेने दोन दिवसांतच पकडून त्याच्या मुसक्या आवळल्या होत्या.

१५ साक्षीदार, सबळ पुरावे आणि दिवटे यांचा निर्णायक युक्तिवाद - हा खटला तब्बल सहा वर्षे - २०२० ते २०२६ - चालला. या काळात न्यायालयात एकेक पुरावा, एकेक साक्षीदार - सरकारी पक्षाने अत्यंत काटेकोरपणे मांडले.

या खटल्यात १५ साक्षीदारांची साक्ष नोंदवण्यात आली. त्यात वैद्यकीय अधिकारी संदीप कचेरिया यांची महत्त्वाची साक्ष झाली. सहाय्यक पोलीस निरीक्षक पप्पु कादरी यांनी अनेक सबळ पुरावे व परिस्थितीजन्य पुरावे न्यायालयात सादर केले होते. त्याच्या आधारावर सरकारी वकील जयंत दिवटे यांनी प्रबळ युक्तिवाद करून प्रतिवाद्यांचा युक्तिवाद खोडून काढला. या गुन्ह्याच्या निकालासाठी पैरवी अधिकारी सहाय्यक फौजदार प्रवीण डावरे, महिला पो.कॉ. नयना पंडीत, शितल तोरकडी यांनी महत्त्वाचे काम केले.

मुख्यमंत्र्यांचे ५०% वरून ९५% चे उद्दिष्ट - या निकालाचे महत्त्व काय?

मुख्यमंत्री फडणवीस यांनी नुकतेच सांगितले की, महाराष्ट्रातील न्यायालयांमध्ये आज फक्त ५०% गुन्हे सिद्ध होतात. म्हणजे निम्मे आरोपी तांत्रिक कारणांमुळे, पुराव्यांच्या अभावामुळे किंवा साक्षीदार फितूर झाल्यामुळे निर्दोष सुटतात. हे प्रमाण ९५% वर नेण्यासाठी पोलिसांचा तपास, पुरावे जमविणे आणि सरकारी वकिलांचा युक्तिवाद - या तिन्ही घटकांमध्ये आमूलाग्र सुधारणा आवश्यक आहे. संगमनेरचा हा खटला याचेच आदर्श उदाहरण आहे. पोलिसांनी घटनास्थळी तत्काळ पंचनामा केला, भौतिक पुरावे जमवले, आरोपी पळाला तरी पकडला, जेल फोडून गेला तरी पुन्हा पकडला - आणि सरकारी वकील दिवटे यांनी सहा वर्षांच्या दीर्घ सुनावणीत एकेक पुरावा बिनतोड मांडून गुन्हा सिद्ध केला. हेच ते मॉडेल आहे, जे मुख्यमंत्र्यांना राज्यभर रुजवायचे आहे.

ही शिक्षा म्हणजे आरोपी राहुल काळेचा गुन्हेगार कार्यकाळ संपवणारी आहे, अशा प्रतिक्रिया जनतेतून उमटत आहेत. ज्या कुटुंबाने सहा वर्षे न्यायासाठी संघर्ष केला, त्यांना आज न्याय मिळाला. वडगावपानच्या गावकऱ्यांनी या निकालाचे स्वागत केले असून पोलीस यंत्रणा व सरकारी वकिलांच्या परिश्रमाचे कौतुक केले आहे. मुख्यमंत्र्यांचे ९५% गुन्हा साबितचे उद्दिष्ट साध्य करायचे असेल, तर संगमनेरसारखे निकाल राज्याच्या कानाकोपऱ्यातून यायला हवेत, हाच या प्रकरणाचा खरा संदेश आहे.

# महिला व बालकांच्या पोषणात सुधारणेचे उद्दिष्ट - मुख्यमंत्री फडणवीस

मुंबई (जिल्हा माहिती अधिकारी)- राज्यातील कुपोषणाच्या समस्येवर मात करून महिला व बालकांच्या आरोग्य आणि पोषणात लक्षणीय सुधारणा घडवून आणण्याच्या दिशेने महाराष्ट्राने महत्त्वपूर्ण पाऊल टाकले आहे. महिला व बाल विकास विभाग आणि चिल्ड्रन्स इन्व्हेस्टमेंट फंड फाउंडेशन (सीआयएफएफ) यांच्यात महिला व बालकांच्या पोषणासंदर्भात पाच वर्षांसाठी सामंजस्य करार (एमओयू) करण्यात आला असून, या भागीदारीमुळे माता व बाल पोषण निर्देशांकात मोठी उंची गाठली जाईल, असा विश्वास मुख्यमंत्री



देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला आहे. महिला व बाल विकास विभागाचे सचिव डॉ. अनुपकुमार यादव यांच्या उपस्थितीत हा करार झाला. यावेळी चिल्ड्रन्स इन्व्हेस्टमेंट फंड फाउंडेशनच्या कार्यकारी संचालक मंजुला सिंग, डायरेक्टर स्ट्रॅटेजिक इनिशिएटिव्हज अँड पार्टनरशिप्स अखिल पाळीअथ, आणि अन्य वरिष्ठ प्रतिनिधी उपस्थित होते. या कराराअंतर्गत कुपोषणावर प्रभावी नियंत्रणासाठी विशेष भर देण्यात येणार आहे.

प्रधानमंत्री मातृ वंदना योजना (पीएमएमव्ही) सारख्या थेट लाभ हस्तांतरण योजनांचा लाभ अधिकाधिक पात्र महिलांपर्यंत पोहोचवून त्यांचा प्रभावी वापर सुनिश्चित केला जाणार आहे. सुरुवातीच्या टप्प्यात पालघर, जालना, नंदुरबार, गडचिरोली, आणि अमरावती या जिल्ह्यांमध्ये यासंदर्भातील अंमलबजावणी करण्यात येणार असून, राज्यस्तरावरही तांत्रिक साहाय्य दिले जाणार आहे. तसेच, सीआयएफएफ कडून पोषण व सार्वजनिक आरोग्य तज्ज्ञांची नियुक्ती करून प्रभावी जनजागृती आणि संदेशवहनाला चालना दिली जाणार आहे. गर्भधारणेपासून बालकाच्या आयुष्यातील पहिल्या १००० दिवसांदरम्यान योग्य पोषण आणि आरोग्य सवयी रुजवण्यासाठी व्यापक मोहीम राबविण्यात येणार आहे.

पुराव्यावर आधारित उपाययोजना, तांत्रिक साहाय्य, आणि क्षेत्रीय कर्मचाऱ्यांच्या क्षमता विकासाच्या माध्यमातून सेवा अधिक सक्षम केली जाईल. कार्यक्रमांचे रिअल-टाइम निरीक्षण, डेटाआधारित निर्णय प्रक्रिया, आणि सक्षम मॉनिटरिंग प्रणालीमुळे योजनांची गुणवत्ता आणि परिणामकारकता वाढविण्यात येणार आहे. या भागीदारीमुळे सेवा वितरण यंत्रणा अधिक बळकट होऊन महिला व बाल विकास विभागाच्या योजनांची पोहोच आणि गुणवत्ता वाढेल. परिणामी, महाराष्ट्रातील माता व बालकांच्या आरोग्यपूर्ण आणि सक्षम भविष्यास नवी दिशा मिळणार असल्याची माहिती महिला व बालविकास विभागामार्फत देण्यात आली.

# युद्धाचे नवे रणांगण : मन आणि मशीन यांचा संघर्ष

आधुनिक लष्करी व्यवस्थेचे स्वरूप झपाट्याने बदलत असताना एक गोष्ट प्रकर्षाने जाणवते, ती म्हणजे धातू, शस्त्रसामग्री आणि अत्याधुनिक यंत्रणांबद्दलची वाढती मोहिनी. एखाद्या राष्ट्राची ताकद आजही रणगाडे, हवाई दलाची क्षमता आणि स्वयंचलित प्रणालींच्या संगणकीय क्षमतेवर मोजली जाते. परंतु अलीकडील युद्धांनी, विशेषतः युक्रेनमधील संघर्षाने, केवळ तांत्रिक सामर्थ्य पुरेसे नसल्याचे स्पष्ट केले आहे. मोठ्या प्रमाणातील मनुष्यबळ, मानसिक स्थैर्य आणि सामूहिक इच्छाशक्ती या घटकांनीच निर्णायक भूमिका बजावली आहे. तरीही युद्धाच्या या नव्या युगात आपण अजूनही हार्डवेअरवर अधिक भर देत आहोत, पण त्या प्रणाली चालवणाऱ्या मानवी मनाच्या क्षमतेकडे दुर्लक्ष करत आहोत, ही एक गंभीर त्रुटी आहे.

युद्धातील बदलत्या स्वरूपात सायबर युद्ध, कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित दिशाभूल आणि माहितीचा प्रचंड प्रवाह हे महत्त्वाचे घटक बनले आहेत. आज लढाई केवळ रणांगणावर होत नाही, तर ती माणसाच्या विचारांमध्ये, भावनांमध्ये आणि धारणा व्यवस्थेतही चालू आहे. सैनिक रणांगणावर जितका वेळ घालवतो, तितकाच तो माहितीच्या आणि मानसिक दबावाच्या जाळ्यातही अडकलेला असतो. त्यामुळे युद्धाचा निकाल ठरवणारे अंतिम साधन हे केवळ बंदूक किंवा क्षेपणास्त्र नसून मानवी मनाची स्थिरता आणि निर्णयक्षमता बनली आहे.

आजच्या काळात सर्वात मोठा धोका म्हणजे 'ज्ञानात्मक पतन'. याचा अर्थ समाजात वास्तव आणि असत्य यामधील सीमारेषा धूसर होणे. डीपफेक, कृत्रिम बुद्धिमत्तेने तयार केलेले मजकूर, बदललेले ध्वनी आणि व्हिडिओ यामुळे सत्य ओळखणे अधिकाधिक कठीण होत चालले आहे. जेव्हा समाजात सामायिक सत्याचा आधारच हरवतो, तेव्हा मतभेद तीव्र होतात आणि संघर्ष निर्माण होण्याची शक्यता वाढते. लष्करी पातळीवर ही स्थिती अत्यंत धोकादायक ठरू शकते. जर सैनिकांना मिळणारी माहितीच दिशाभूल करणारी असेल, तर त्यांच्या निर्णयक्षमतेवर त्याचा थेट परिणाम होतो. यामुळे केवळ रणांगणावरच नव्हे, तर संपूर्ण लष्करी व्यवस्थेत गोंधळ निर्माण होऊ शकतो.




तंत्रज्ञानाच्या प्रगतीने अनेक सुविधा निर्माण केल्या असल्या, तरी त्याचबरोबर नव्या प्रकारच्या असुरक्षाही वाढवल्या आहेत. बॅटल मॅनेजमेंट सिस्टमसारख्या प्रणाली सैनिकांना रणांगणाचे डिजिटल चित्र देतात, पण प्रत्यक्ष परिस्थितीत ताणतणावामुळे त्या माहितीचे योग्य आकलन करणे कठीण होते. गोळीबाराच्या परिस्थितीत वाढलेली हृदयगती, भीती आणि मानसिक दबाव यामुळे निर्णय चुकण्याची शक्यता वाढते. त्यामुळे केवळ तांत्रिक प्रशिक्षण पुरेसे नसून, मानसिक तणावावर नियंत्रण ठेवण्याचे प्रशिक्षण देणेही तितकेच आवश्यक ठरते.

युद्धातील आणखी एक महत्त्वाचा पैलू म्हणजे नेतृत्वातील मानसिकता. अनेकदा वरिष्ठ स्तरावर घेतले जाणारे निर्णय हे जोखीम टाळण्याच्या प्रवृत्तीवर आधारित असतात. त्यामुळे रणांगणावर काम करणाऱ्या सैनिकांच्या नवकल्पनांना अडथळा निर्माण होतो. प्रत्यक्षात सैनिक परिस्थितीनुसार त्वरित बदल करण्यास सक्षम असतात, पण प्रशासकीय मर्यादा त्यांच्या कार्यक्षमतेवर बंधने आणतात. यामुळे युद्धातील गती मंदावते आणि संधी गमावल्या जातात. आजच्या वेगवान युद्धप्रणालीत लवचिकता आणि तत्परता हीच यशाची गुरुकिल्ली आहे.

ड्रोन युद्ध आणि इलेक्ट्रॉनिक युद्धाच्या वाढत्या प्रभावामुळे रणांगणाचे स्वरूप अधिक गुंतागुंतीचे झाले आहे. अशा परिस्थितीत स्थानिक पातळीवर निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य देणे आवश्यक आहे. सैनिकांना नवकल्पना करण्याची आणि अपयश स्वीकारण्याची मुभा दिली, तरच ते बदलत्या परिस्थितीशी जुळवून घेऊ शकतील. अन्यथा, कठोर नियम आणि प्रक्रियांमुळे त्यांच्या क्षमतेवर मर्यादा येतात.

याच पार्श्वभूमीवर 'ब्रेन ड्रेन' ही समस्या अधिक गंभीर बनत आहे. तांत्रिक कौशल्य असलेले आणि अनुभवी व्यक्ती लष्करी व्यवस्थेत टिकून राहत नाहीत. यामागे केवळ आर्थिक कारणे नसून मानसिक असंतोष आणि नवकल्पनांना मिळणाऱ्या मर्यादित संधी हेही मोठे घटक आहेत. जर प्रतिभावान व्यक्तींना योग्य वातावरण मिळाले नाही, तर ते इतर क्षेत्रांकडे वळतात, ज्याचा थेट परिणाम लष्करी क्षमतेवर होतो.

युद्धातील सर्वात महत्त्वाचा पण दुर्लक्षित घटक म्हणजे भावनिक बुद्धिमत्ता. अत्यंत तणावाच्या परिस्थितीत मानवी स्मरणशक्ती मोठ्या प्रमाणात कमी होते. अशा वेळी निर्णय घेण्यासाठी मानसिक स्थैर्य अत्यावश्यक असते. भावनिक बुद्धिमत्ता असलेले नेते आपल्या टीममधील ताण कमी करू शकतात आणि योग्य निर्णय घेण्यास मदत करतात. ते माहितीच्या माध्यमातून होणारी छेडछाड ओळखू शकतात आणि परिस्थितीवर नियंत्रण ठेवू शकतात.

आजच्या युद्धात तंत्रज्ञान जितके महत्त्वाचे आहे, तितकेच मानवी मनाचे प्रशिक्षणही आवश्यक आहे. जर आपण केवळ शस्त्रसामग्रीवर भर दिला आणि मानवी क्षमतांकडे दुर्लक्ष केले, तर सर्वात प्रगत तंत्रज्ञानही निरुपयोगी ठरू शकते. भविष्यातील युद्धे जिंकण्यासाठी केवळ मशीन नव्हे, तर त्यामागील माणूस अधिक सक्षम असणे गरजेचे आहे. मानसिक ताकद, निर्णयक्षमता आणि भावनिक स्थैर्य यांचा संगमच आधुनिक युद्धात यश मिळवून देऊ शकतो.

शेवटी, आधुनिक संघर्षाचे केंद्र मानवी विचार आणि भावनांकडे सरकत असल्याचे स्पष्ट दिसते. त्यामुळे लष्करी प्रशिक्षणामध्ये मानसिक क्षमतांना तितकेच महत्त्व देणे आवश्यक आहे. तंत्रज्ञान पुढे जाईल, नवनवीन शस्त्रे निर्माण होतील, पण त्यांचा प्रभावी वापर करण्यासाठी सक्षम मानवी मन हीच खरी किल्ली ठरणार आहे. भविष्यात विजय त्याच राष्ट्रांचा होईल, जे आपल्या सैनिकांच्या मानसिक आणि भावनिक क्षमतांचा विकास करण्यावर भर देतील.

संगमनेरकरांनी गौरविलेले
।।जय श्रीराम।।
सुपर शॉपी
निवडक किराणा, ड्रायफुट, कॉस्मेटिक
जीवन ज्योती, गणेशनगर, संगमनेर
एस. आर. थोरात दुध व बाय प्रोडक्टस्
प्रोप्रा. अशोक रा. जाधव
फोन (०२४२५) २२१७८८,२२३६२९, मोबा. ९८२२४२५५२२
क्रेडीट कार्ड व डेबिट कार्ड वापरण्याची सुविधा

मणके विकार, गुडघेविकार, अस्थिविकार
सुरिक्षत, खात्रिशीर व परीपूर्ण उपचारासाठी आजच भेटा
डॉ. सुभाष दत्तात्रय मंडलिक
मणके विकार, गुडघेविकार
व अस्थिविकार चिकीत्सक
(२४ वर्षांचा प्रदिर्घ अनुभव)
मंदना मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल
लक्ष्मी नगर, रहाणे मळा, संगमनेर
संपर्क - ९८२२७०९०३०

जिथे काळजी आणि उपचार एकत्र येतात...
ताम्हाणे हॉस्पिटल
• मेडिसिन • सर्जरी
• स्त्रीरोग - प्रसुति
• मुळव्याध-भगंदर-फिशर
• लेझर सेंटर
डॉ. ताम्हाणे विशाल वसंत
(M.S.) शल्य
कन्सल्टंट जनरल व लेझर सर्जन
डॉ. ताम्हाणे रुपाली विशाल
स्त्रीरोग / प्रसुती चिकित्सक
इंदिरा नगर, गल्ली नं. १०, संगमनेर
: Help Line :
7219 100 100

शेतकऱ्यांचा श्वास ! ग्राहकांचा विश्वास !!
राजहंस
दर्जेदार राजहंस दूध व दूग्धजन्य पदार्थ
संगमनेर तालुका सह. दूध उत्पा. व प्रक्रिया संघ मर्या.
अमृतनगर (घुलेवाडी), ता. संगमनेर, जि. अहमदनगर
(०२४२५) २२५४१०, २२५५१०, २२६१६१, २२६१६२
www.rajhansmilk.com rajhansmilk@gmail.com



# दोन कुटुंबात हाणामारी

## तीन गंभीर जखमी, परस्परविरोधी फिर्याद दाखल

**संगमनेर (युवावार्ता प्रतिनिधी)–**

तालुक्यातील एका गावातील दोन भिन्न समाजातील मुलगी व मुलाच्या प्रकरणाला गंभीर वळण प्राप्त होत एकमेकांवरील आरोप प्रत्यारोपाचे पर्यावसन दोन कुटुंबातील हाणामारीत झाले. यात तीन जण गंभीर जखमी झाले असून, या प्रकरणी दोन्ही कुटुंबाने दिलेल्या परस्परविरोधी फिर्यादीमुळे पोक्सोसह भारतीय न्याय संहितेच्या विविध गंभीर कलमान्वये संगमनेर पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल झाले आहेत.

याबाबत पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार एका समाजाच्या अल्पवयीन मुलीचा साखरपुडा मोडून, तिच्या भावी वराला जिवे मारण्याची धमकी देत, पीडितेसह तिच्या कुटुंबाला १० ते १५ जणांच्या टोळक्याने लाकडी दांडक्याने मारहाण केल्याची, तसेच पीडितेला लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य

केल्याचा आरोप करीत, तिच्या आईच्या फिर्यादीवरुन संगमनेर शहर पोलीस ठाण्यात बालकांचे लैंगिक गुन्ह्यांपासून संरक्षण कायदा (पोक्सो) सह भारतीय न्याय संहितेच्या विविध कलमान्वये गुन्हा दाखल झाला आहे.

फिर्यादीत म्हटले आहे की, तिच्या १६ वर्ष ८ महिने वयाच्या मुलीला गावातीलच एक मुलगा तिच्या वडिलांच्या मोबाईलवर अश्लिल मेसेज पाठवून तसेच तिच्याशी लग्न करण्याची गळ घालीत होता. त्याला समजावून सांगण्याचे सर्व प्रयत्न निष्फळ झाल्याने, पीडितेच्या आई वडिलांनी तीचा साखरपुडा रविवार (ता. २९) रोजी सकाळी ११ वाजता तालुक्यातीलच एका कुटुंबातील मुलाशी निश्चित केला होता. याची माहिती कळताच संबंधित मुलाने त्या पाहुण्यांना मी तिच्याशी लग्न करणार असून, तुमच्या मुलाने तिच्याशी लग्न केल्यास त्याला जीवे मारुन तिला पळवून नेणार असल्याची धमकी दिल्याने, हा साखरपुडा त्या पाहुण्यांनी रद्द केला. अकराच्या सुमारास त्या कुटुंबाच्या घरासमोर जमलेल्या जमावाने फिर्यादीच्या पतीसह कुटुंबातील लोकांना लाकडी दांडक्याने मारहाण केली. तसेच पीडितेला स्पर्श करुन लज्जा उत्पन्न होईल असे वर्तन केले. या प्रकरणी पोलिसांनी सुशांत पर्बत, आदित्य पर्बत, सुरज पर्बत, संतोष पर्बत, सुरेश पर्बत, अक्षय पर्बत, भैय्या पर्बत, संतोष कारभारी पर्बत, चिल पर्बत, अनिकेत पठाडे व इतर ५ ते ६ अनोळखी इसमांविरुद्ध भारतीय दंड संहिता (बीएनएस), २०२३च्या ७४, ७५, ७८, ११८ (१), ३५२, ३५१ (२), १८९ (२), १९१ ( २ ), १९०, व बालकांचे लैंगींक अपराधांपासून संरक्षण अधिनियम, २०१२ चे ८ व १२ नुसार गुन्हा दाखल केला आहे. या गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस निरीक्षक समीर बारवकर यांच्या मार्गदर्शनाखाली महिला पोलीस उपनिरीक्षक फराहनाज पटेल करीत आहेत.

याच मारहाण प्रकरणी सुशांत पर्बत याने संगमनेर शहर पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीनुसार त्या कुटुंबातील महिला व पुरुषांनी लाकडी दांडक्यांनी बेदम मारहाण करुन दोघांना गंभीर जखमी केल्याची तक्रार केली आहे. या प्रकरणी ११ जणांवर भारतीय न्याय संहिता ११८ (२), ११८ (१), १८९ (२), १९१, २, ३, १९० प्रमाणे गुन्हा दाखल झाला असून या गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस निरीक्षक समीर बारवकर यांच्या मार्गदर्शनाखाली आर. जे. लोखंडे करीत आहेत.

READ
E- NEWS ON
Yuvavarta.in
VISIT INSTAGRAM
daily_yuvavarta

HAPPY Birthday

मा. श्री. इंद्रजीत थोरात
संचालक, स.म.भा.सं.थोरात
सह. साखर कारखाना

मा. डॉ. नामदेव गुंजाळ
संचालक, व्हीजन कोचिंग क्लासेस

मा. प्रा. बाबा खरात
आदिवासी सेवक
शुभेच्छुक
दैनिक युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता
YUVA
POLYPRINT
& PACKAGING INDUSTRIES

# भोंदू अशोक खरातसह पाच जणांवर शिर्डीत गुन्हा दाखल, दोघांना अटक, जमीन हडपल्याचा आरोप

साकुरी (युवावार्ता प्रतिनिधी)-

शिर्डी येथील रावसाहेब गोंदकर यांची चार एकर मौल्यवान जमीन व्याजाच्या व्यवहारातून फसवणूक करून हडप केल्याप्रकरणी भोंदू बाबा अशोक खरात याच्यासह पाच जणांविरोधात शिर्डी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणात पोलिसांनी मोठी कारवाई करत दोघांना अटक केली असून, बेकायदेशीर सावकारी आणि कोट्यवधींच्या आर्थिक फसवणुकीच्या या प्रकरणाचा तपास आता वेगाने सुरू झाला आहे.



पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, रावसाहेब गोंदकर यांना व्यवसायासाठी ३ कोटी रुपयांची गरज होती. भोंदू बाबा अशोक खरात याने त्यांना प्रति महिना २ टक्के व्याजाने पैसे दिले होते. या व्यतिरिक्त आणखी २ कोटी ५२ लाख रुपये दिले, ज्यापैकी १ कोटी ६४ लाख रुपये किरण सोनवणे, अरविंद बावके आणि अशोक तांबे यांच्या मार्फत देण्यात आले होते. गोंदकर यांनी व्याजाचे पैसे वेळोवेळी परत केले होते. मात्र, हिशोब पूर्ण करून आपली वडिलोपार्जित जमीन परत नावावर करून घेण्यासाठी त्यांनी प्रयत्न केला असता, अशोक खरात, त्याची पत्नी कल्पना खरात आणि अरविंद बावके यांनी टाळाटाळ सुरू केली. व्यवहार पूर्ण न करताच विश्वासघात करून गोंदकर यांची जमीन नावावर करून न देता त्यांची आर्थिक फसवणूक करण्यात आली.

या फसवणुकीचा प्रकार एवढ्यावरच थांबला नाही, तर सोनवणे याने स्वाक्षरी करून दिलेले चेकबुकमधील चेकचा गैरवापर करून गोंदकर यांच्या बँक खात्यातील रक्कम परस्पर वर्ग करून घेतली. या प्रकरणी रावसाहेब गोंदकर यांनी दिलेल्या फिर्यादीवरून कॅप्टन अशोककुमार खरात, कल्पना अशोककुमार खरात (दोघे रा. नाशिक), किरण नानासाहेब सोनवणे (रा. निमगाव कोऱ्हाळे), अरविंद पांडुरंग बावके (रा. साकुरी) आणि अशोक परभत तांबे यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शिर्डी पोलिसांनी आरोपींविरोधात गुन्हा रजिस्टर नंबर २१३/२६ नुसार गुन्हा नोंदवला आहे. मुख्य आरोपी अशोक खरात हा यापूर्वीच अन्य गुन्ह्याखाली जेलमध्ये असून, पोलिसांनी किरण सोनवणे व अरविंद बावके यांना अटक केली असून पुढील तपास शिर्डी पोलीस करीत आहेत.

# राजूरमध्ये भगवान महावीर जयंती मिरवणूक उत्सवात

राजूर (प्रतिनिधी)-



राजूर येथे भगवान महावीर जयंती निमित्ताने जैन समाजाच्या वतीने विधीमय पूजा करून भव्य मिरवणूक काढण्यात आली. भगवान महावीर संपूर्ण जगाला अहिंसा, दया, क्षमा, शांती, मैत्री, जगा आणि जगू द्या, असा संदेश देणारे, त्यांच्या जयंती निमित्त भव्य मिरवणूक काढण्यात आली होती. महावीर जयंती निमित्त राजूर येथील गुजराती, जैन समाजबांधवांनी रविवारी सकाळी पार्श्वनाथ भगवान मंदिरात नित्याची पाठ केली. यानंतर महाआरती करण्यात आली.

विश्वस्त प्रकाश शाह आणि शशिकांत ओहरा यांच्या मार्गदर्शनाखाली सायंकाळी भगवान महावीर यांच्या प्रतिमेची राजूर शहरातून भव्य मिरवणूक काढण्यात आली होती. वाद्याच्या गजरात तरुणाईने टिपरी नृत्य सादर केले, महिलांनीही मोठ्या प्रमाणात आपला सहभाग नोंदवला. महाप्रसादाने कार्यक्रमाची सांगता झाली. यावेळी टिपरी पथक सर्वांनी ठेका धरून मिरवणुकीचे आकर्षण ठरले होते.

नेहमीच शिस्तमय असणारे जैन बांधव आज मिरवणुकीमध्ये शिस्तमय दाखवून दिले, तसेच महिला ही मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी सुनील शहा, पंकज ओहरा, सुधीर ओहरा, ब्रिजेश ओहरा, अल्पेश मेहता, शैलेश ओहरा, अनिकेत शहा, परेश ओहरा, हर्षद ओहरा, दर्शन ओहरा, निखिल मेहता, साहिल मेहता, आदी सह मोठ्या संख्येने समाज बांधव उपस्थित होते. यावेळी राजूरचे सहा. पोलीस निरीक्षक किशोर पवार यांच्या मार्गदर्शनाखाली चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

# अकरा मारुतींचे महत्त्व आणि समर्थांची बलोपासना

हनुमान जयंतीच्या निमित्ताने समर्थ रामदास स्वामी यांनी जे अकरा मारुती स्थापन केले, ते खूप महत्त्वाचे आहेत. त्यांनी संपूर्ण भारत भ्रमण करून संघटना आणि शक्ती संवर्धन यांचे मूर्तीमंत प्रतीक असलेले मारुतीची मंदिरे ठिकठिकाणी स्थापन केली. हिंदू समाज संघटित आणि सामर्थ्यशाली बनवा, हा त्यांचा हेतू होता. स्वामी विवेकानंद यांनी सुद्धा रामकृष्ण आश्रमाद्वारे धर्मप्रसाराचे कार्य सुरू केले. तेव्हा बेलूर मठात मारुतीची स्थापना करून ते म्हणाले, करा बरे सर्वत्र त्या महावीर हनुमानाची पूजा. सारे राष्ट्र कसे निर्वीर्य, चेतनाहीन बनले आहे, असा संदेश त्यांनी दिला. समाजाचे ओज, अस्मिता अखंड राहावी, म्हणून रामदास स्वामींनी अकरा मारुतीची मंदिरे स्थापन केली. त्यातील बहुसंख्य मारुतीची मंदिरे ही वीर रूप आहेत. प्रभू रामचंद्रांच्या समोरील मारुती मात्र दास मारुती आहे. मारुतीच्या ठिकाणी असलेली प्रचंड बलाची उपासना आज आवश्यक आहे. मारुती जवळ शक्ती सामर्थ्य, भक्ती सामर्थ्य, युक्ती सामर्थ्य, बुद्धी सामर्थ्य, सिद्धी समर्थ सेवा सामर्थ्य, अशी विविध सामर्थ्य होती.

अनेकांनाही ११ मारुतीची ठिकाणे माहिती नाही. त्याचे महत्व माहिती नाही. समर्थांनी महाराष्ट्रामध्ये अनेक ठिकाणी मारुतीची स्थापना केली, परंतु त्यांनी स्थापन केलेले अकरा मारुती ते अतिशय प्रसिद्ध आहेत. १) शहापूर येथील स्थापन केलेल्या मारुतीला शहापूरचा चुन्याचा मारुती असेच म्हणतात. २) श्रीक्षेत्र मसूर येथील मारुतीला महारुद्र मारुती असे म्हणतात. ३) चाफळ येथील मारुती. या ठिकाणी प्रभू श्री रामचंद्र यांचे मंदिर असून, मंदिराच्या मागच्या बाजूला प्रताप मारुती आहे, आणि पुढील बाजूला ४) दास मारुती आहे. ५) श्रीक्षेत्र शिंगणवाडी येथील मारुतीला खडीचा मारुती असे म्हणतात. ६) श्रीक्षेत्र उंब्रज येथील मारुती हा बाल मारुती आहे. ७) श्रीक्षेत्र माजगाव येथील मारुतीला माजगाव चा मारुती या नावाने ओळखतात. ८) श्रीक्षेत्र बहे बोरगाव येथील मारुती कृष्णा नदीच्या काठी आहे. ९) श्रीक्षेत्र मन पाडळे येथील मारुती हा उत्तराभिमुख आहे. १०) श्रीक्षेत्र पारगांव अकरा मारुती पैकी येथील मूर्ती सर्वात लहान आहे. ११) श्री क्षेत्र शिराळे येथील मारुती. अशाप्रकारे अकरा मारुतींची रामदास स्वामींनी स्थापना करून बलोपासना आवश्यक आहे, हे सांगितले. हिंदू धर्माची ही अकरा मारुतीची मंदिरे अतिशय पवित्र असून, हिंदू धर्मियांनी एकदा तरी या अकरा मारुतीचे दर्शन घ्यावे. भक्ती आणि शक्ती याचे खरे रूप म्हणजे हनुमान मारुती. सात चिरंजीवांपैकी हनुमान एक चिरंजीव आहे. प्रभू रामचंद्रांच्या परिवारामध्ये एकच व्यक्ती अशी आहे की, त्याचे मंदिर आहे, ती म्हणजे रामभक्त हनुमान किंवा मारुती.

मानसशास्त्र, राजनीति शास्त्र, तत्त्वज्ञान अशा विषयात हनुमान पारंगत होता. स्वतंत्र प्रज्ञाशक्ती आणि बुद्धिमत्ता त्याच्याकडे होती. हनुमान हा शील संपन्न दूत आहे. लंकेमध्ये रात्रीच्या वेळी सीतेचा शोध घेताना त्याला




अनेक सुंदर स्त्रिया दिसल्या, परंतु त्याचे मन विचलित झाले नाही. कारण प्रभू श्री रामचंद्रांचे काम करण्यासाठी या ठिकाणी मी आलो आहे. त्यामुळे मनात जरा सुद्धा विकृती आली नाही. रामायणातील सुंदर कांड हे हनुमंताच्या लीलांनी भरलेले आहे. प्रभू श्री रामचंद्र हनुमंताला प्राज्ञ, धीर, वीर असे म्हटले आहे. हनुमान जेव्हा श्रीलंकेतून परत येतो आणि श्रीरामांना भेटतो, तेव्हा तो प्रथम म्हणतो, द्रष्टा सीता मया राम. हनुमान सीता शब्द प्रथम उच्चारत नाही. कारण सीता शब्द उच्चारला असता, तर प्रभू रामचंद्रांना शंका आली असती. त्यामुळे अत्यंत विचारपूर्वक हनुमताने सीता शब्द नंतर उच्चारला. आज असुरी विचार, स्त्रियांवर होणाऱ्या अत्याचार, संस्कृती नष्ट करण्याचा प्रयत्न, याची संख्या वाढली आहे. अशा वृत्तीचे दहन करण्यासाठी वीर मारुतीची गरज आहे. आपल्यालाही वीर मारुती सारखी भक्ती आणि शक्ती या दोन्हींचा वापर करून आपले संस्कृती टिकवावी लागणार आहे.

पूर्वी बाहेरील लोकांनी आक्रमणे करून आपली संस्कृती नष्ट करण्याचा प्रयत्न केला, परंतु आज आपल्याच देशातील लोक आपली संस्कृती, आपला धर्म, आपले सात्विक विचार नष्ट करण्याचा प्रयत्न करीत आहे. म्हणून नुसते शनिवारी मारुतीचे दर्शन घेऊन उपयोग नाही. ते दर्शन घ्यायचेच आहे, परंतु हनुमाना जवळ प्रार्थना करायची आहे, भक्ती आणि शक्ती मला कशी मिळेल, यासाठी त्याची उपासना करायची आहे, आणि मिळालेली शक्ती चांगल्या कामासाठी आपण वापरली पाहिजे. आपल्या हिंदू धर्माचे दैवत प्रभु श्री रामचंद्र आणि रामभक्त हनुमान हे आपले आदर्श आहेत. आपण शनी मंदिरात गेल्यानंतर प्रथम मारुतीरायाचे दर्शन घ्यावे, आणि मग शनि देवाचे दर्शन घ्यावे. याचे कारण मारुतीने शनीला परास्त केलेले आहे. त्यामुळे प्रथम मारुतीचे दर्शन घेतले आणि नंतर शनि देवाचे दर्शन घेतलेले चांगले.

भक्ती आणि शक्ती यांचा एक नम्र उपासक म्हणजेच दास मारुती आणि वीर मारुती. समर्थांच्या शिष्या वेणाबाई यांनी त्यांच्या अभंगांमध्ये अकरा मारुतीच्या स्थळाबद्दल उल्लेख केलेला आहे. चाफळा माजी दोन, उंब्रेजेसी येक! परागांवी देख चौथा तो हा!! पाचवा मसूरी, शहापुरी सहावा! जाण तो सातवा शिराळ्यात!! सिंगणवाडी आठवा, मन पाडळे नववा! दहावा जाणावा माज गावी!! बाह्यांत अकरावा येणे तरी गावा!! सर्व मनोरथ पूर्वील!! वेणी म्हणे स्वामी समर्थ रामदास! कीर्ती गगनांत न समावे!! मारुतीरायाचे भीमरूपी स्तोत्र आणि हनुमान चालीसा रोज अवश्य म्हणावे.

**प्रा. शशांक गंधे, संगमनेर**
**मो. नं. ९८९०१६३६४२**

# 'माझं गाव, आरोग्यसंपन्न गाव' अभियानाला १ एप्रिलपासून प्रारंभ

**अहिल्यानगर**
**(जिल्हा माहिती कार्यालयाकडून)**




महाराष्ट्राच्या ग्रामीण भागाचा चेहरामोहरा बदलण्यासाठी आणि ग्रामीण जनतेला दर्जेदार आरोग्य सुविधा त्यांच्या उंबरठ्यावर उपलब्ध करून देण्यासाठी राज्य सरकारने 'माझं गाव, आरोग्यसंपन्न गाव' हे महत्त्वाकांक्षी अभियान सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्या मार्गदर्शनाखाली आणि सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर तसेच राज्यमंत्री मेघना साकोरे बोर्डीकर यांच्या पुढाकाराने हे राज्यव्यापी अभियान १ एप्रिलपासून सुरू होत आहे.

हे अभियान केवळ सरकारी कार्यक्रम न राहता लोकसहभागातून व्यापक आरोग्य चळवळ उभी राहावी, असा शासनाचा मानस आहे. प्रत्येक गाव आरोग्यसंपन्न करण्याच्या उद्देशाने राबविण्यात येणाऱ्या या उपक्रमामुळे गाव ते राज्यस्तरावरील आरोग्य यंत्रणा अधिक सक्षम होणार असून तळागाळापर्यंत वैद्यकीय सेवा पोहोचणार आहेत.

या अभियानाचे वैशिष्ट्य म्हणजे उपचारांपेक्षा प्रतिबंधावर भर. नागरिकांच्या आरोग्यविषयक सवयींमध्ये सकारात्मक बदल घडवून आणत आरोग्यदायी जीवनशैली रुजवणे हे मुख्य उद्दिष्ट आहे. यासाठी स्वच्छता, शुद्ध पाणीपुरवठा, सांडपाणी व्यवस्थापन, पोषण यांसारख्या घटकांवर विशेष लक्ष दिले जाणार आहे. तसेच संसर्गजन्य व असंसर्गजन्य आजार, माता-बाल आरोग्य आणि मानसिक आरोग्य यांचाही समावेश करण्यात आला आहे. ग्रामपंचायतीपासून जिल्हा परिषदेपर्यंत सर्व आरोग्य यंत्रणा या अभियानात सक्रिय सहभाग घेणार आहेत.

अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी राज्य ते ग्रामपंचायत स्तरावर समित्या स्थापन करण्यात आल्या आहेत. ठरवलेल्या निकषांनुसार ७० टक्क्यांपेक्षा अधिक गुण मिळवणाऱ्या गावांना 'आरोग्यसंपन्न गाव' म्हणून गौरविण्यात येणार असून त्यांना स्मृतिचिन्ह, प्रमाणपत्र व रोख पुरस्कार दिले जाणार आहेत. या अभियानासाठी ८०.७५ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे.

उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या जिल्हा परिषदांना अनुक्रमे ५ कोटी, ३ कोटी आणि २ कोटी रुपयांचे पुरस्कार दिले जाणार आहेत. पंचायत समित्यांसाठी २ कोटी, १.५ कोटी आणि १.२५ कोटी रुपयांची तरतूद आहे. ग्रामीण रुग्णालये, उपजिल्हा रुग्णालये, प्राथमिक आरोग्य केंद्रे व उपआरोग्य केंद्रांसाठीही लाखोंच्या स्वरूपात पुरस्कार दिले जाणार आहेत. गावांनाही जिल्हा, विभाग आणि राज्य स्तरावर अनुक्रमे २५ लाख, १ कोटी आणि ५ कोटी रुपयांचे पुरस्कार मिळणार आहेत. हे अभियान दरवर्षी १ एप्रिल ते ३१ मार्च या कालावधीत राबवले जाणार असून गावांना आपली कामगिरी सुधारण्याची आणि पुरस्कार मिळवण्याची संधी मिळणार आहे.

## संपादकीय...

# ट्रम्पशाही विरोधात अमेरिकन जनता रस्त्यावर

भारताचे चीनविषयक धोरण हे केवळ आर्थिक सहकार्य किंवा लष्करी संघर्ष या दोन टोकांच्या पर्यायांमध्ये अडकलेले नसून ते नियंत्रित आणि संतुलित परस्परावलंबित्वावर आधारित एक सुबुद्ध आणि व्यावहारिक धोरण म्हणून विकसित होत आहे. जून २०२० मधील गलवान खोऱ्यातील संघर्षानंतर भारत-चीन संबंधांमध्ये राजकीय विश्वास कमी झाला आणि सुरक्षा परिस्थिती अधिक तणावपूर्ण झाली, तरीही एक मूलभूत वास्तव बदलले नाही, ते म्हणजे भारताची आर्थिक वाढ ही प्रादेशिक आणि जागतिक उत्पादन साखळ्यांशी घट्ट जोडलेली आहे आणि त्या साखळीत चीनची महत्त्वपूर्ण भूमिका आहे. या पार्श्वभूमीवर भारताने एक संतुलित दृष्टिकोन स्वीकारला आहे, ज्यामध्ये कोणत्याही एकाच देशावर अति अवलंबित्व टाळण्याचा प्रयत्न आहे, कारण संकटकाळात हेच अवलंबित्व दबावाचे साधन ठरू शकते, पण त्याच वेळी पूर्णपणे संबंध तोडल्यास देशांतर्गत उत्पादन, खर्च आणि रोजगारावर विपरीत परिणाम होऊ शकतो, ही जाणीवही स्पष्टपणे ठेवली गेली आहे. आर्थिक वर्ष २०२४-२५ मध्ये भारत-चीन द्विपक्षीय व्यापार सुमारे १२७.७ अब्ज अमेरिकन डॉलरपर्यंत पोहोचला असून त्यात आयात सुमारे ११३.५ अब्ज डॉलर आणि निर्यात केवळ १४.३ अब्ज डॉलर इतकी राहिली, त्यामुळे सुमारे ९९.२ अब्ज डॉलरची व्यापार तूट निर्माण झाली आहे, जी केवळ आकड्यांपुरती मर्यादित नसून इलेक्ट्रॉनिक्स, यंत्रसामग्री, रसायने, अक्षय ऊर्जा आणि औषधनिर्मिती यांसारख्या क्षेत्रांमध्ये चीनवर असलेले अवलंबित्व अधोरेखित करते. मात्र या तुटीकडे केवळ राजकीय दृष्टिकोनातून पाहण्याऐवजी ती धोरणात्मक विश्लेषणासाठी एक महत्त्वाचे साधन म्हणून वापरणे अधिक आवश्यक ठरते, कारण जागतिक उत्पादन साखळ्यांच्या युगात द्विपक्षीय संतुलन हे आर्थिक ताकदीचे संपूर्ण चित्र दाखवत नाही, तर देशाची एकूण बाह्य आर्थिक स्थिती अधिक महत्त्वाची असते, आणि भारताची चालू खाते तूट ही सकल देशांतर्गत उत्पादनाच्या सुमारे ०.६ टक्के इतकी मर्यादित असल्याने व्यापक आर्थिक स्थैर्य टिकून आहे. तरीही विशिष्ट घटकांवरील जास्त अवलंबित्व ही भू-आर्थिक जोखीम निर्माण करू शकते, कारण उत्पादन साखळीच्या वरच्या स्तरावर केंद्रीकरण असल्यास परवाना प्रक्रियेत विलंब, कागदपत्रांमधील अडथळे किंवा निवडक निर्यात निर्बंध यांसारख्या लहान वाटणाऱ्या गोष्टीही मोठे आर्थिक अडथळे निर्माण करू शकतात. त्यामुळे भारताचा भर आता केवळ व्यापार तूट कमी करण्यावर नसून विशिष्ट क्षेत्रांतील असुरक्षितता ओळखून ती कमी करण्यावर आहे. यासाठी उत्पादन संलग्न प्रोत्साहन योजना हे एक महत्त्वाचे साधन ठरले असून त्याद्वारे देशांतर्गत उत्पादन, पुरवठा साखळी आणि मूल्यवर्धन वाढवण्याचा प्रयत्न होत आहे, ज्यामुळे मार्च २०२५ पर्यंत सुमारे २०.०९ अब्ज अमेरिकन डॉलरची गुंतवणूक आकर्षित करण्यात यश आले आहे. यासोबतच भारताने मानके, तांत्रिक नियम, अनुरूपता अटी, अँटी डम्पिंग शुल्क, प्रतिपूरक उपाय आणि संरक्षणात्मक उपाय यांसारख्या नियमाधारित साधनांचा वापर वाढवून आयात नियंत्रण आणि देशांतर्गत उद्योग संरक्षण यामध्ये संतुलन साधण्याचा प्रयत्न केला आहे. राष्ट्रीय सुरक्षेच्या दृष्टीने सीमेलगतच्या देशांतील गुंतवणुकीवर नियंत्रण, खरेदीतील प्राधान्य धोरण, दूरसंचार क्षेत्रातील विश्वासार्ह स्रोत तत्त्वे आणि डेटा आधारित प्लॅटफॉर्म्सवरील कडक तपासणी यांसारख्या उपाययोजना राबवण्यात आल्या आहेत. २०२० नंतरच्या काळात काही क्षेत्रांमध्ये जलद प्रगती झाली असली तरी उत्पादन क्षेत्रात अजूनही वरच्या स्तरावरील अवलंबित्व कायम आहे, हे वास्तव स्वीकारावे लागते. त्यामुळे मुख्य आव्हान म्हणजे अशा महत्त्वाच्या घटकांमध्ये विविधीकरण करणे आणि पर्याय निर्माण करणे, जे अल्पावधीत कठीण असले तरी दीर्घकालीन दृष्टीने आवश्यक आहे. जोखीम कमी करण्याच्या प्रक्रियेमुळे सुरुवातीला खर्च वाढतो, नियमांचे पालन करावे लागते आणि पुरवठादारांचे पर्याय मर्यादित होतात, परंतु दीर्घकाळात यामुळे आर्थिक लवचिकता आणि स्वायत्तता वाढते. विशेषतः स्वच्छ ऊर्जा, इलेक्ट्रॉनिक्स आणि प्रगत उत्पादन यांसारख्या क्षेत्रांमध्ये भारत विस्तार करत असताना महत्त्वाच्या खनिज आणि प्रक्रियायुक्त घटकांवरील अवलंबित्व ही मोठी जोखीम ठरू शकते. त्यामुळे भारताने दोन स्तरांवर रणनीती आखली आहे, एक म्हणजे देशांतर्गत क्षमता वाढवणे आणि दुसरे म्हणजे बाह्य भागीदारीद्वारे विविधीकरण करणे, कारण पूर्ण आत्मनिर्भरता ही व्यवहार्य उद्दिष्ट नसून लवचिकता वाढवणे हा खरा हेतू आहे.






# कै. माधवराव रामभाऊ हासे यांना भावपूर्ण श्रद्धांजली

## आपले नाव हृदयात आहे...

राजापूरच्या पवित्र मातीचा मान वाढवणारा,
संगमनेरच्या भूमीचा अभिमान ठरलेला
आपला आप्पा,
स्मृतीत राहिलेला, हृदयात जपलेला

मृदू स्वभाव, गोड वाणी,
मन जिंकण्याची जादू अपार,
करिष्माई व्यक्तिमत्त्व, लोकांचा नेता,
जनतेच्या हृदयात सदैव आधार

जात-धर्म, वयाचा भेद न मानता,
सर्वांना एकत्र जोडणारा धागा होता,
प्रत्येकाच्या दुःखात धावून येणारा,
आप्पा म्हणजे माणूसकीचा झरा होता

शेट म्हणून ज्यांना जग ओळखत होतं,
ते आमच्यासाठी होते आप्पा-दादा,
घराचा कणा, प्रेमाचा सागर,
आयुष्याला दिशा देणारा खरा वडीलधारा

२४ मार्चचा तो काळजाला भिडणारा क्षण,
जेव्हा काळाने आमच्यातून हिरावून नेलं,
राजापूरच्या रस्त्यांवर उसळलेला जनसागर,
प्रत्येक डोळ्यात अश्रूंचं पाणी भरून आलं

तुमच्या अंतिम यात्रेत जमलेली माणसं,
तुमच्या कार्याची साक्ष देत होती,
प्रेम, आदर, आणि विश्वासाचा ठेवा,
तुमच्या नावाने जगत होती

आज, या स्मरणाच्या दिवशी
आम्ही सारे,
तुमच्या आठवणींना वंदन करतो,
तुमचे विचार, तुमची शिकवण,
आमच्या प्रत्येक पावलात जपतो


आप्पा, तुम्ही दूर गेलात जरी,
तरी आमच्या मनातून
कधीच जाणार नाही,
तुमच्या आदर्शांच्या प्रकाशात,
आमचा मार्ग कधीच हरवणार नाही

तुमच्या आत्म्यास शांती लाभो,
हीच ईश्वरचरणी प्रार्थना आहे,
आमच्या हृदयात कोरलेले आपले नाव,
सदैव आमच्या हृदयात जिवंत आहे

**उदय शिवाजी हासे,**
**राजापूर**

एकच नेता इथे जन्मला, राजापूर गावात
माझ्या शेठ च नाव गाजतय संगमनेर तालुक्यात !!
सुंदर अस्तित्व निर्माण केले राजापूर गावात
जनतेसाठी अपमान झेलला आपल्या निधड्या छातीवर !!
प्राणपणाने लढले शेठ, भरोसा ज्या जनतेवर
माझ्या शेठ च नाव गाजतय संगमनेर तालुक्यात!!
आठवण येते मनामनातून, त्यांचं कार्य दिसल्यावर
जात, पात ना धर्म पाहिला जगला माणुसकीवर !!
पुन्हा जन्म घ्या अशी इच्छा गावकऱ्यांच्या हृदयावर
माझ्या शेठ च नाव गाजते संगमनेर तालुक्यात !!

**प्रियंका मीनानाथ घुले**



काही माणसं आपल्या पदामुळे मोठी होत नाहीत, तर आपल्या कर्मामुळे लोकांच्या हृदयात घर करतात. संगमनेर तालुक्यातील राजापूर गावचे माजी सरपंच आणि समाजकारणात सक्रिय असलेले माधवराव रामभाऊ हासे हे असेच एक नाव. त्यांचे अकाली निधन ही केवळ एक बातमी नाही, तर एका समर्पित आयुष्याचा अंत आहे.

माधव शेठ हासे यांचा प्रवास हा सामान्य माणसातून लोकनेत्यापर्यंतचा होता. त्यांनी कधीही प्रसिद्धीची अपेक्षा ठेवली नाही; पण लोकांच्या गरजा ओळखून त्यासाठी झटणे हेच त्यांचे ध्येय होते. गावच्या विकासासाठी त्यांनी केलेले प्रयत्न आजही अनेकांच्या आठवणीत जिवंत आहेत. सरपंच म्हणून काम करताना त्यांनी गावातील मूलभूत सुविधा, पाणी, रस्ते आणि शासकीय योजनांचा लाभ सामान्य लोकांपर्यंत पोहोचवण्यासाठी प्रामाणिकपणे मेहनत घेतली.

राजकारणात राहूनही त्यांनी माणुसकी जपली. संजय गांधी निराधार योजनेचे अध्यक्ष म्हणून काम करताना त्यांनी गरजू, निराधार आणि वंचित घटकांपर्यंत मदतीचा हात पोहोचवला. त्यांच्यासाठी प्रत्येक गरजू व्यक्ती ही एक जबाबदारी होती. सेवा हीच खरी पूजा या तत्त्वावर त्यांनी आयुष्य जगले.

त्यांची ओळख केवळ नेता म्हणून नव्हे, तर एक संवेदनशील माणूस म्हणून होती. गावातील कोणतीही अडचण असो, आजारी व्यक्ती, शेतकऱ्यांचे प्रश्न किंवा तरुणांचे भविष्य माधव शेठ नेहमी पुढे असायचे. लोकांशी त्यांचा संवाद साधा, मनमोकळा आणि विश्वासार्ह होता. म्हणूनच ते केवळ नेता नव्हते, तर प्रत्येकाच्या घरातील एक आपला माणूस होते.

त्यांच्या निधनाने संगमनेर तालुक्यात एक मोठी पोकळी निर्माण झाली आहे. पण त्यांच्या कार्याची प्रेरणा मात्र कायम राहणार आहे. त्यांनी दाखवलेला मार्ग, निस्वार्थ सेवा, प्रामाणिकपणा आणि समाजासाठी समर्पण हीच त्यांची खरी ओळख आहे.

माधव काका हासे यांचे आयुष्य आपल्याला शिकवते की, मोठेपणा पदात नसतो, तो आपल्या कृतीत असतो. जर प्रत्येकाने त्यांच्या प्रमाणे आपल्या समाजासाठी काहीतरी करण्याचा निर्धार केला, तरच त्यांना खरी श्रद्धांजली ठरेल. माणूस जातो, पण त्याची माणुसकी आणि कार्य अमर राहते.

**उद्धव जिजाबा हासे,**
**राजापूर**

# राज्यात ५५ लाख नागरिकांना औषधोपचाराचा लाभ देण्याचे उद्दिष्ट

**अहिल्यानगर (जिल्हा माहिती कार्यालयाकडून)**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, केंद्रीय आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालयाच्या माध्यमातून देशातील १२ राज्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर 'मास ड्रग ॲडमिनिस्ट्रेशन' (एमडीए) मोहीम राबवली जात असून, त्यामध्ये महाराष्ट्राचाही समावेश आहे. या मोहिमेत पात्र नागरिकांना दरवर्षी प्रतिबंधात्मक औषधे दिली जातात, ज्यामुळे रोगाचा प्रसार रोखण्यास मदत होते. राज्यामध्ये विशेष म्हणजे, काही निवडक जिल्ह्यांमध्ये पारंपरिक दोन औषधांऐवजी 'ट्रीपल ड्रग थेरपी' (आयडीए) वापरली जात आहे. ही उपचारपद्धती अधिक प्रभावी मानली जाते आणि कमी कालावधीत रोग नियंत्रणात आणण्यास मदत करते. महाराष्ट्रातील विदर्भ विभागात हत्तीरोगाचा मोठा प्रादुर्भाव असून, गडचिरोली, भंडारा, चंद्रपूर, यासारख्या जिल्ह्यांमध्ये विशेष मोहिमा राबवण्यात येत आहेत. राज्यात सुमारे ५५ लाख नागरिकांना या औषधोपचाराचा लाभ देण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.

**तहसिलदार,तथा कार्यकारी दंडाधिकारी संगमनेर,**
**यांचे कार्यालय ता. संगमनेर,जिल्हा अहिल्यानगर**

ई-मेल : tahsildarsangamner@gmail.com
दूरध्वनी (०२४२५) २२५३५३
क्र. कावी/ जन्म नोंद/५३२/२०२६
संगमनेर, दिनांक - २४/०३/२०२६

## जाहिरनामा

याद्वारे सर्व लोकांना जाहिररित्या कळविण्यात येते की, अर्जदार श्री. रहेमान छोटूभाई इनामदार, रा. कोकणगाव, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर यांनी दिनांक ०९/०३/२०२६ रोजी दाखल केलेल्या अर्जावरुन सुरु करण्यात आले. अर्जदार हे रा. कोकणगाव ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर येथील रहिवासी असून अर्जदार यांचे आई नामे शहेजादी छोटूभाई इनामदार यांचा मृत्यू मौजे शिवापूर ता. संगमनेर जि. अहिल्यानगर येथे दिनांक २७/०४/२०२१ रोजी झाला असून त्यांची मृत्यू नोंद निबंधक तथा ग्रामविकास अधिकारी कोकणगाव-शिवापूर यांचे कार्यालयामध्ये उपलब्ध नसल्यामुळे त्याबाबतची नोंद घेण्याबाबतचे प्रकरण या कार्यालयात दाखल केले आहे.

तरी ज्या व्यक्तींना तक्रारी/हरकती दाखल करावयाच्या असल्यास निबंधक तथा ग्रामविकास अधिकारी कोकणगाव-शिवापूर यांचे कार्यालयाचे नोटीस बोर्डावर जाहीरनामा प्रसिध्दी झाल्या पासुन ३० दिवसाचे आत सुटीचे दिवस वगळून लेखी स्वरुपात तक्रार या कार्यालयात दाखल करावी. मुदतीनंतर त्या तक्रारीचा विचार केला जाणार नाही, कृपया याची नोंद घ्यावी.

**तहसिलदार संगमनेर**


**पाहिजेत**
शिलाई मशीन कामासाठी महिला - ०२
सेल्स एक्झिक्युटिव्ह - ०१
अमोल होम डेकोर
मालदाड रोड, संगमनेर
8788483245
8698001007

**त्वरित पाहिजेत**
द्वारकादास शामकुमार
सेल्समन | कॅशियर
स्टोअर मॅनेजर
फ्लोअर मॅनेजर
हेल्पर | सिक्युरीटी
कामाची सोयीस्कर वेळ
१० ते ७ | १२ ते ९
9511238422

**धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल**
We treat He cure's
डॉ. प्रविणकुमार पानसरे मो. ९८२२३९७५७४
डॉ. दिपाली पानसरे मो. ७४९९१७६८६४
उपलब्ध सुविधा: मेडिसीन विभाग, सर्जरी विभाग, अस्थिरोग विभाग, सुपर स्पेशालिटी सुविधा,स्त्रीरोग विभाग, न्युरो सर्जरी, प्लास्टिक सर्जरी, युरो सर्जरी, कॅन्सर सर्जरी
महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत डायलेसिस सुविधा उपलब्ध
या योजनेअंतर्गत येणाऱ्या ऑपरेशनचा लाभ घेण्यासाठी आपले ओरिजनल आधार कार्ड व रेशनकार्ड असणे गरजेचे आहे
धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर, जि. अ.नगर, फोन (०२४२५) २२७५७४, २२७५७५

युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता


**पाहिजेत**
अकाऊंटंट | जागा ०२
टॅली ईआरपी ९ चे ज्ञान आवश्यक, अकौंट, बँक, रिपोर्ट जनरेशन, सॅलरी, जीएसटी, रिकव्हरी आदींचे सखोल ज्ञान आवश्यक,
अनुभव : ३ वर्षे
आकर्षक पगार व इतर सुविधा
बायोडाटा पाठवा - ९८२२०३९४६०
dailyyuvavarta@gmail.com
वाटचाल तीन दशकांची




卐 अक्षयतृतीयेच्या शुभमुहूर्तावर 卐
MALPANI
**मालपाणी उद्योग समूह** आयोजित
**भव्य सर्वधर्मीय सामुदायिक विवाह सोहळा!**
रविवार, दि. १९ एप्रिल २०२६, सायं.४ वाजता | ठिकाण - मालपाणी लॉन्स, कॉलेज रोड, संगमनेर
- प्रत्येक नवविवाहित दाम्पत्याला स्टील कपाट, दिवाण-गादी व संसारोपयोगी साहित्य भेट!
- वरासाठी ड्रेस, फेटा/उपरणे व वधुसाठी साडी
- सर्वांसाठी भोजन व्यवस्था

सर्वधर्मीयांसाठी खुला व मोफत विवाह सोहळा
नोंदणीसाठी कायद्यानुसार वधूचे वय १८ वर्षे व वराचे वय २१ वर्षे असणे बंधनकारक
विवाह नोंदणी सुरु झाली आहे, त्वरित संपर्क करावा...प्रवेश मर्यादित!
संपर्क : एच.आर. विभाग, मालपाणी इंडस्ट्रीयल पार्क, अकोले रोड, संगमनेर
श्री. राहुल शेरमाळे (9960 253 607) | श्री. रविंद्र कानडे (9850 890 618)

**जाहिरात छोटी सुवर्णसंधी मोठी**

**वॉचमन पाहिजे**
बांधकाम साईट वर वॉचमन भरणे आहे
राहण्याची सोय आहे
संपर्क - नविन नगर रोड, संगमनेर
8378956909
8459199913

**बंगला भाड्याने पाहिजे**
2500 स्क्वेअर फूट बांधकाम व 4 व्हिलर गाडी पार्किंग सुविधा, बागेसाठी जागा असलेला नवीन नगर रोड, विद्यानगर, जाणता राजा मैदान, मालपाणी हॉस्पिटल परिसरात बंगला भाडे तत्त्वावर त्वरीत पाहिजे
- संपर्क -
9503626111
9272165050

**पाहिजेत**
सेल्समन - १ जागा
सर्विस प्रोव्हायडर हेल्पर ०१ जागा
अकाउंटंट - ०१ जागा
कामाचे ठिकाण : संगमनेर
M/s. Pawar and Sons
7498621873

**पाहिजेत**
डॉक्टर्स ०२- महिला (बी.ए.एम.एस/एम.डी.)
पंचकर्म थेरपिस्ट - ४ (स्त्री/पुरुष) ट्रेनिंग दिले जाईल
रिसेप्शनिस्ट - २ (महिला) कॉम्प्युटर ज्ञान आवश्यक
ओ. टी. ॲसिस्टंट - १ (पुरुष)
माधवबाग क्लिनिक
९३२५०२८६८६

**पाहिजेत**
मुलगा/ पुरुष कर्मचारी
आकर्षक पगार
श्री विश्वगंध आयुर्वेद हॉस्पिटल
नवीन नगर रोड संगमनेर
Biodata सह भेटणे
9822283079

**हेल्पर पाहिजे**
साईकृपा एंटरप्राईजेस
पिकअप/छोटा हत्ती (लोकल वाहतुक) गाडी ड्रायव्हर बरोबर कामासाठी हेल्पर पाहिजे
पत्ता- मालपाणी मल्टिप्लेक्स समोर, संगमनेर
9767059977

**CHANGE IN NAME**
I HAVE CHANGED MY OLD NAME KAUSARBI IBRAHIM SHAIKH
TO NEW NAME AS KAUSAR IBRAHIM SHAIKH
ADD - 787, NAIKWADPURA, NEAR JAMA MASJID, SANGAMNER, TAL -SANGAMNER DIST AHMEDNAGAR

**CHANGE IN NAME**
I HAVE CHANGED MY OLD NAME ADIL IBRAHIM SHAIKH
TO NEW NAME AS AADIL IBRAHIM SHAIKH
ADD - DONGARE MALA, RAHEMATNAGAR ,JORVE ROAD, SANGAMNER, TAL- SANGAMNER DIST- AHILYANAGAR


दैनिक युवावार्ता कार्यालय, संगमनेर,०२४२५- २२५१२९
७६२०३८८२३०, ८३८०९५६६०४, ८८३०५०८२४४

वाचकांसाठी निवेदन- सर्व प्रकारच्या जाहिरातींमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो, यातील कोणत्याही माहितीच्या,व्यवहाराच्या सत्यतेबाबत 'दैनिक युवावार्ता व्यवस्थापन' हमी देऊ शेत नाही, याची नोंद घ्यावी

# कै. माधवराव रामभाऊ हासे यांना भावपूर्ण श्रद्धांजली

## समाजसेवेचा आधारवड



॥ भावपूर्ण श्रद्धांजली ॥

## माधवराव केवळ नाव नाही तर सेवाभावाचे प्रतीक

संगमनेर तालुक्यातील एक कर्तृत्ववान, जनतेच्या मनात घर करणारे आणि सेवाभावाने आयुष्य व्यतीत करणारे व्यक्तिमत्त्व म्हणजे माधव रामभाऊ हासे. त्यांच्या आकस्मिक निधनाची बातमी समजताच संपूर्ण तालुका शोकसागरात बुडाला. एक विश्वासू कार्यकर्ता, संवेदनशील नेता आणि समाजासाठी सदैव झटणारा माणूस हरपल्याची भावना प्रत्येकाच्या मनात निर्माण झाली.

माधवराव हासे हे फक्त एक नाव नव्हते, तर ते सेवाभावाचे प्रतीक होते. त्यांना जनसेवेचा वारसा त्यांच्या पूर्वजांकडूनच लाभला होता. शेतकरी म्हणून साधे जीवन जगत असतानाही त्यांनी समाजातील प्रत्येक घटकाच्या सुख-दुःखात सहभागी होण्याची परंपरा जपली. गावातील एखादा व्यक्ती अडचणीत असो, आजारी असो किंवा शासकीय कामासाठी त्रस्त असो - माधवराव हे त्या प्रत्येकासाठी आशेचा किरण होते. मदतीसाठी ते नेहमी धावून जात असत.

राजापूर गावात त्यांना माधवशेठ या नावाने ओळखले जायचे. त्यांच्या नावामागे लोकांचा विश्वास आणि प्रेम दडलेले होते. गावातील अनेक निर्णय, संस्था आणि उपक्रम त्यांच्या सल्ल्यानेच राबवले जात. त्यांच्या नेतृत्वामुळे राजापूरमध्ये अनेक विकासकामे मार्गी लागली. पाणीपुरवठा योजना, पाण्याच्या टाक्या, आरोग्य उपकेंद्र, रस्ते यांसारख्या मूलभूत सुविधा निर्माण करण्यासाठी त्यांनी सातत्याने प्रयत्न केले. या सर्व कामांसाठी त्यांनी संबंधित लोकप्रतिनिधींशी पाठपुरावा करत गावाच्या विकासाला गती दिली.

संगमनेर तालुक्याचे नेते व माजी मंत्री बाळासाहेब थोरात साहेब यांचे ते विश्वासू कार्यकर्ते होते. राजकारणात त्यांनी निरपेक्षतेने भक्कम साथ केली. म्हणून गावच्या सरपंचपदापासून संजय गांधी योजनेच्या तालुकाध्यक्ष पर्यंत त्यांना राजकारणात संधी मिळाली. २००५ ते २००७ या कालावधीत ते राजापूरचे सरपंच होते. तसेच २००७ ते २०१२ पंचायत समिती सदस्य म्हणून काम करताना त्यांनी राजापूर गणात अनेक विकासकामे पूर्ण केली. शासकीय योजना प्रभावीपणे राबवून त्यांनी सामान्य जनतेपर्यंत त्या पोहोचवल्या. त्यांच्या कार्यकाळात त्यांनी प्रशासन आणि जनता यांच्यातील दुवा म्हणून काम केले. त्यामुळे अनेकांना शासकीय योजनांचा लाभ सहजपणे मिळू शकला.

माधवरावांचा स्वभाव हा त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा सर्वात मोठा पैलू होता. ते स्पष्टवक्ते होते. एखादे काम होणार नसेल तर ते स्पष्ट नाही म्हणत, पण जर एखादे काम शक्य असेल तर ते पूर्ण होईपर्यंत त्याचा पाठपुरावा करत. त्यांच्या या प्रामाणिक स्वभावामुळे लोकांचा त्यांच्यावर प्रचंड विश्वास होता. ते प्रेमळ, दिलदार आणि माणुसकी जपणारे व्यक्ती होते. लहान मुलांपासून ते ज्येष्ठ नागरिकांपर्यंत सर्वांशी त्यांचे जिव्हाळ्याचे संबंध होते.

त्यांचे जनसंपर्क जाळे अत्यंत भक्कम होते. राजापूर पंचक्रोशीतील गुंजाळवाडी, घुलेवाडी, वेल्हाळे, सायखिंडी, चिकणी, निमगाव भोजापुर, जवळे कडलग, चिखली, वडगाव लांडगा, पिंपळगाव, धांदरफळ, मंगळापुर, कासारा दुमाला, ढोलेवाडी अशा अनेक गावांमध्ये त्यांनी आपलेपणाने लोकांशी नाते जोडले होते. त्यांच्या सेवाभावामुळे त्यांचा मित्रपरिवारही मोठा होता. त्यांच्या कार्याची दखल घेत त्यांना संजय गांधी निराधार योजनेचे अध्यक्षपद देण्यात आले. या जबाबदारीला त्यांनी पूर्ण न्याय दिला. गावोगाव फिरून त्यांनी खऱ्या अर्थाने निराधार, गरजू आणि वृद्ध व्यक्तींचा शोध घेतला. त्यांना रेशन कार्ड मिळवून देणे, योजनेचे मानधन मिळवून देणे, राहण्यासाठी घर मिळवून देणे अशा अनेक प्रकारची मदत केली. त्यांच्या कार्यामुळे अनेक कुटुंबांना आधार मिळाला. या योजनेत त्यांनी केलेले कार्य आजही आदर्श मानले जाते.

माधवराव हासे हे कोणत्याही वेळी, कोणत्याही परिस्थितीत मदतीसाठी तत्पर असायचे. स्वतःचे काम, शेतीची कामे बाजूला ठेवून ते गरजूंना मदत करायला धावून जात. पंचायत समिती, तहसील कार्यालय, पोलीस स्टेशन, वीज मंडळ किंवा सार्वजनिक बांधकाम विभाग - कुठल्याही कार्यालयात नागरिकांना अडचण आली तर माधवराव त्यांच्यासोबत उभे राहायचे. अधिकाऱ्यांनाही त्यांच्या प्रामाणिकपणाची जाणीव असल्यामुळे त्यांच्या शब्दाला मान दिला जायचा. त्यांचा साधा पण लक्षात राहणारा पेहराव डोक्यावर टोपी, पांढरा शर्ट आणि पांढरा पायजमा - हा त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा अविभाज्य भाग होता. चेहऱ्यावर कायम हास्य, टोपी थोडी तिरकी आणि मनमोकळं बोलणं या गुणांमुळे ते प्रत्येकाच्या मनात कायमचे घर करून गेले.

त्यांच्या निधनाने राजापूर आणि पंचक्रोशीवर दुःखाचा डोंगर कोसळला. त्यांच्या अंत्ययात्रेला हजारो लोकांनी उपस्थित राहून त्यांना अखेरचा निरोप दिला. २८ मार्च रोजी झालेल्या शोकसभेलाही विविध क्षेत्रातील मान्यवर, ग्रामस्थ आणि त्यांचे मित्र मोठ्या संख्येने उपस्थित होते. गेल्या अनेक वर्षांत एवढ्या मोठ्या जनसंख्येने त्यांची झालेली अंत्ययात्रा लोकांच्या सदैव स्मरणात राहील.

मरावे परी कीर्ती रूपी उरावे या उक्तीप्रमाणे माधवराव हासे आज आपल्यामध्ये नसले तरी त्यांची कीर्ती, त्यांचे कार्य आणि त्यांची आठवण सदैव जिवंत राहतील. त्यांनी जपलेली माणुसकी, सेवाभाव आणि लोकांप्रती असलेले प्रेम हेच त्यांचे खरे स्मरण ठरेल. माधवराव हासे यांचे जाणे हे केवळ त्यांच्या कुटुंबाचेच नव्हे तर संपूर्ण गावाचे आणि पंचक्रोशीचे मोठे नुकसान आहे. त्यांच्या स्मृतींना विनम्र अभिवादन आणि भावपूर्ण श्रद्धांजली.

**– किसन भाऊ हासे**
**संस्थापक, दैनिक युवावार्ता, संगमनेर**

## कै. माधवराव रामभाऊ हासे

॥ भावपूर्ण श्रद्धांजली ॥

श्री. बाळासाहेब थोरात (माजी महसूल मंत्री, महाराष्ट्र राज्य)
डॉ. सुधीर तांबे (माजी आमदार, विधान परिषद)
आ. सत्यजीत तांबे ( विधान परिषद सदस्य)
आ. अमोल खताळ (विधानसभा सदस्य)
सौ. दुर्गाताई तांबे ( माजी नगराध्यक्षा)
सौ. डॉ. मैथिली तांबे ( नगराध्यक्षा संगमनेर न. परिषद)
डॉ. जयश्री थोरात ( एकविरा फाऊंडेश अध्यक्ष)
श्री. पांडूरंग घुले ( उपाध्यक्ष स. म. भा. थो. सा. का.)
श्री. रामहरी कातोरे ( माजी जि. प. सदस्य)
श्री. विष्णूपंत रहाटळ (माजी पं. स. सदस्य)
श्री. अमर कतारी ( शिवसेना (उबाठा) उपजिल्हा प्रमुख)
श्री. नरेंद्र गुंजाळ (सरपंच, ग्रा.पं. गुंजाळवाडी)
श्री. अतुल कडलग (निमगाव भोजापूर)
श्री. डी. एम. लांडगे (वडगाव लांडगा)
श्री. कैलास अण्णा देशमुख (जवळे कडलग)
श्री. पंडीत गुंजाळ, (गुंजाळवाडी)
श्री. चंद्रकांत घुले ( सामाजिक कार्यकर्ते)
श्री. संदीप कर्पे (पिंपळगाव कोंझिरा)
अमृत उद्योग समुह, सर्व पदाधिकारी व अधिकारी
ग्रामपंचायत राजापूर ( ग्रा. वि. अधिकारी व कर्मचारी)
राजापूर सहकारी सोसायटी (सर्व संचालक व कर्मचारी)
प्रागतिक शिक्षण संस्था (सर्व पदाधिकारी व शिक्षकवृंद)
धनलक्ष्मी सह. पतसंस्था (सर्व संचालक व कर्मचारी)
म्हाळुंगेश्र्वर सह. दुध संस्था (सर्व संचालक व कर्मचारी)
लोकविकास सह. पतसंस्था (सर्व संचालक व कर्मचारी)
स. म. भा. थो. सह. दुध संस्था (सर्व संचालक व कर्मचारी)
स्वा. सै. सावळेराम बाबुराव देशमुख सह. पतसंस्था
जनकल्याण सह. पतसंस्था (सर्व संचालक व कर्मचारी)
जनकल्याण सह. दुध संस्था (सर्व संचालक व कर्मचारी)
इंदिरा सह. पतसंस्था (सर्व संचालक व कर्मचारी)
राजापूर हुतात्मा स्मारक समिती, राजापूर
हुतात्मा हॅालीबॉल क्लब, राजापूर
राजापूरकर फाऊंडेशन (अध्यक्ष व सर्व सदस्य)
सर्व ग्रामस्थ, राजापूर व पंचक्रोशी
कै. माधवराव हासे मित्र मंडळ व आप्तेष्ठ

## नेतृत्व, दातृत्व, कर्तृत्वाचा संगम म्हणजे माधवराव हासे

**वाटले नव्हते कोणालाही असे अघटीत घडून जाईल,**
**देव तुम्हाला आपल्या कुशीत घेईल...**

माधव शेठ हे किती दूरदृष्टीचे आणि धाडसी उद्योजक होते, याची अनेक उदाहरणे त्यांच्या आयुष्यात पाहायला मिळतात. साधारणपणे १९८२ च्या सुमारास, जेव्हा रामायण ही मालिका सुरू झाली, त्या काळात त्यांनी आपल्या स्वतःच्या जागेत टीव्हीसारखे उपकरण उभारून राजापूरसारख्या ठिकाणी लोकांना मालिका आणि विविध चित्रपट दाखवण्याचा अभिनव उपक्रम सुरू केला. त्या काळात ही केवळ व्यवसायाची संधी नव्हती, तर सामाजिक बांधिलकी जपणारी सेवा होती. या उपक्रमात त्यांना सुभाषशेठ हासे आणि बाळासाहेब गोसावी यांची साथ लाभली. तिघांनी मिळून हा व्यवसाय यशस्वीपणे चालवला; मात्र काळ बदलत गेला, घरोघरी टीव्ही पोहोचले आणि हा व्यवसाय बंद करावा लागला.

यानंतरही त्यांनी न थांबता पुंजाहरी सोनवणे यांच्या सहकार्याने लाकडाचा व्यवसाय सुरू केला. लाकूड गोळा करून ते मुंबईतील बेकरी उद्योगासाठी पुरवठा करत होते. पुढे खोपोली येथे बाळासाहेब गोसावी यांच्या सोबत ब्लास्टिंगचा व्यवसायही त्यांनी उभारला. या सर्व उपक्रमांतून त्यांची विविध क्षेत्रात काम करण्याची तयारी, नवीन संधी ओळखण्याची क्षमता आणि सर्वांना सोबत घेऊन चालण्याची वृत्ती स्पष्ट दिसून येते. विशेष म्हणजे अनेक भागीदार असूनही त्यांच्यात कधीही मतभेद किंवा वाद निर्माण झाल्याचे ऐकिवात नाही. पारदर्शक आर्थिक व्यवहार आणि प्रामाणिकपणा हे त्यांच्या स्वभावाचे मुख्य वैशिष्ट्य होते.

व्यवसायातून त्यांनी प्रत्येक व्यक्तीशी जिव्हाळ्याचे संबंध निर्माण केले. या नात्यांमुळेच ग्रामस्थांनी त्यांना ग्रामपंचायत निवडणूक लढवण्याचा आग्रह धरला. त्यांनी तो मान्य करत २००५ च्या सुमारास निवडणूक लढवली आणि सरपंच म्हणून निवडून आले. त्यांच्या कार्यकाळात त्यांनी लोकाभिमुख आणि विकासाभिमुख कारभार केला. पुढे पंचायत समिती निवडणुकीतही त्यांनी सहभाग घेतला. मा. बाळासाहेब थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी निवडणूक लढवली, तर त्याच गटातून सध्याचे आ. सत्यजित तांबे हे जिल्हा परिषदेसाठी उभे होते. दोघेही मोठ्या मताधिक्याने निवडून आले.

पंचायत समिती सदस्य म्हणून माधव शेठ यांनी केवळ आपल्या गटापुरता विचार न करता संपूर्ण तालुक्याच्या विकासासाठी काम केले. अनेक कामे त्यांनी मार्गी लावली, असे सर्वत्र मानले जाते. जसजसा त्यांचा लोकसंपर्क वाढत गेला, तसतशी सामाजिक कार्याची आवडही अधिक दृढ झाली. हा वारसा त्यांना त्यांच्या कुटुंबातूनच मिळाला होता. त्यांचे आजोबा स्वर्गीय देवराम दादा मुंबईत तालीम चालवत असत, त्यामुळे त्यांचा परिचय महाराष्ट्रभरातील पैलवान आणि दानशूर व्यक्तींशी होता. (उर्वरीत पान ६ वर)

**– श्री विश्वनाथ बाबा गोसावी**
**राजापूर, ता. संगमनेर**
















# पॅनल देणे आहे

सणांचा आनंद आणि बचतीची सुवर्णसंधी घेऊन येत आहे

ओम महाले अँड ग्रुप प्रस्तुत

**पोपट भगीरथ महाले ज्वेलर्स!**

PBM Jeweller's

अशोक चौक, चावडीजवळ, संगमनेर, जि. अ. नगर

१ तारखेपासून सुरू – फ्री GST स्कीम

होळीच्या शुभमुहूर्तावर सुरू होणारी ही खास ऑफर थेट रमजान ईदपर्यंत – संपूर्ण एक महिना!

- संपर्क - 7599996999 8265036807

लग्नकार्य, वाढदिवस किंवा खास गिफ्टसाठी हीच योग्य वेळ!

या कालावधीत सोनं, चांदी आणि आकर्षक दागिन्यांची खरेदी करा आणि मिळवा GST पूर्णपणे फ्री!

विश्वास, गुणवत्ता आणि शुद्धतेची खात्री पोपट भगीरथ महाले ज्वेलर्स!

मर्यादित कालावधीची ऑफर

आजच भेट द्या आणि बचतीचा सुवर्णयोग साधा!








नोकरीची सुवर्णसंधी

CONTACT : 98223 43319

| | |
|---|---|
| सेल्समन | 05 |
| सेल्सगर्ल | 05 |
| कॉम्प्युटर ऑपरेटर | 02 |
| हेल्पर | 03 |

We are HIRING!

भंडारी

We are HIRING!

मेनरोड कॉर्नर, संगमनेर


# आदरणीय कै. माधव शेठ हासे यांना भावपूर्ण श्रद्धांजली


सासरवाडी व मामांचे गाव गुंजाळवाडी येथील आमच्या गुंजाळ कुटुंबाशी आदरणीय कै. माधव शेठ हासे (मामा) यांचे अतूट नाते होते. देवराम भागु जी गुंजाळ पाटील, कै. काशिनाथ भागुजी गुंजाळ, कै. रेवजी भागुजी गुंजाळ, (आजोबा) कै पंढरीनाथ देवराम गुंजाळ, तसेच कै. भास्कर देवराम गुंजाळ(मामा) या सर्वांच्या परिवाराशी जिव्हाळ्याचे संबंध होते. मामांची माझ्या पाठीमागे कायम खंबीर साथ होती. आमच्या कौटुंबिक नात्यात त्यांनी नेहमीच मोलाचे मार्गदर्शन केले. मामांनी उच्चारलेला प्रत्येक शब्द आमच्यासाठी ब्रह्मवाक्य ठरायचा. माझ्या राजकीय व सामाजिक जीवनात त्यांचे मार्गदर्शन अमूल्य होते.

माधव शेठ संजय गांधी निराधार योजनेचा अध्यक्ष असताना गावातील निराधार, अनाथ आणि वृद्धांना मोठ्या प्रमाणावर लाभ मिळवून देण्यात मामांचा मोठा वाटा होता. तसेच ग्रामपंचायत उपसरपंच व लोकनियुक्त सरपंच म्हणून कार्य करत असताना त्यांनी पडद्यामागून दिलेली साथ आणि मदत अमूल्य होती. मामांनी केवळ राजापूर गावातीलच नव्हे, तर संपूर्ण पंचक्रोशीतील गोरगरीब जनतेची काळजी व जिव्हाळ्याचे संबंध . लोक आपल्या सुख-दुःखाच्या गोष्टी त्यांच्याकडे मोकळेपणाने मांडत असत. त्यांच्या या निस्वार्थ सेवेमुळे संगमनेर तालुक्यात त्यांचा मोठा जनाधार निर्माण झाला होता. आदरणीय मामांच्या अकाली निधनाने केवळ राजापूर गावातच नव्हे, तर संपूर्ण संगमनेर तालुक्यात मोठी पोकळी निर्माण झाली आहे. त्यांच्या जाण्याने सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे.

मामांनी जपलेला गोरगरीब जनतेची सेवा, सर्वधर्मसमभाव आणि लोकांच्या सुख-दुःखात सहभागी होण्याचा वारसा आम्ही कायम जपण्याचा प्रयत्न करू.

भावपूर्ण श्रद्धांजली!

**लोकनियुक्त सरपंच**
**नरेंद्र उर्फ अमोल संभाजी गुंजाळ**
**समस्त ग्रामस्थ, गुंजाळवाडी**



संगमनेर तालुका पंचायत समितीचे माजी सदस्य तसेच संजय गांधी निराधार योजनेचे माजी अध्यक्ष

## कै. माधवराव रामभाऊ हासे

यांना

॥ भावपूर्ण श्रध्दांजली ॥

शोकाकूल

**ग्रामपंचायत कार्यालय, गुंजाळवाडी**
**ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर**

**लोकनियुक्त सरपंच - श्री. नरेंद्र उर्फ अमोल संभाजी गुंजाळ**

**सर्व सदस्य,कर्मचारी व सभासद वृंद**

संगमनेर तालुका पंचायत समितीचे माजी सदस्य तसेच संजय गांधी निराधार योजनेचे माजी अध्यक्ष

## कै. माधवराव रामभाऊ हासे

यांना

॥ भावपूर्ण श्रध्दांजली ॥



शोकाकूल

**श्री. संभाजी हासे**
सामाजिक कार्यकर्ते, राजापूर
ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर



संगमनेर तालुका पंचायत समितीचे माजी सदस्य तसेच संजय गांधी निराधार योजनेचे माजी अध्यक्ष

## कै. माधवराव रामभाऊ हासे

यांना

॥ भावपूर्ण श्रध्दांजली ॥

शोकाकूल

**प्रा. डॉ. के. पी. बैरागी सर**
संस्थापक , शिवकृपा नागरी सहकारी पतसंस्था, हिंगणे खुर्द, पुणे
अध्यक्ष, वैष्णव बैरागी एकता प्रतिष्ठान महाराष्ट्र राज्य, पुणे

## पान ५ वरून - नेतृत्व, दातृत्व, कर्तृत्वाचा...

त्यांची आजी स्व. साळूबाई यांचा अतिथी सत्कार हा आदर्श होता. घरी आलेल्या कोणालाही जेवणाशिवाय परत जाऊ देत नसत. त्यांचे वडील सुद्धा राजापूरचे सरपंच होते. चुलते स्व. विठ्ठलराव हे देखील उत्तम पैलवान होते आणि त्यांचाही मोठा मित्रपरिवार होता. घरात कितीही पाहुणे आले तरी आदरातिथ्यात कधीही कमी पडू नये ही परंपरा माधवशेठ यांनी अखेरपर्यंत जपली. लोकांना घरी बोलावणे, त्यांचे मनापासून स्वागत करणे आणि त्यांचे कौतुक करणे हे त्यांच्या आयुष्याचे अविभाज्य अंग होते.

माणुसकी, स्नेह, कर्तृत्व, नेतृत्व आणि दातृत्व यांची जेव्हा जेव्हा चर्चा होईल, तेव्हा सर्वप्रथम आठवण माधवशेठ यांचीच येईल. त्यांच्या अचानक जाण्याने राजापूर गावावर आणि त्यांच्या कुटुंबावर मोठा मानसिक आघात झाला आहे. ते आपल्यात नाहीत, ही गोष्ट अजूनही मनाला पटत नाही. त्यांचे बालपण, तरुणपण आणि माणसांशी असलेले जिव्हाळ्याचे संबंध आयुष्यभर स्मरणात राहतील. राजकीय आणि सामाजिक जीवनात त्यांनी उल्लेखनीय कामगिरी केली. माजी आ. बाळासाहेब थोरात यांनी त्यांच्यावर ठेवलेला विश्वास त्यांनी पूर्ण निष्ठेने पेलला. पंचायत समिती सदस्य म्हणून तसेच संजय निराधार योजनेच्या अध्यक्षपदावर त्यांनी जबाबदारी पार पाडत सर्वसामान्यांच्या हितासाठी काम केले. गावातील तंटे मिटवताना ते अत्यंत समंजसपणे दोन्ही बाजू ऐकून न्याय्य तोडगा काढत असत, त्यामुळे गावात त्यांचा वेगळाच मान आणि दबदबा निर्माण झाला होता. कोरोना काळात त्यांनी आणि त्यांच्या मित्रपरिवाराने गरजूंना अन्नधान्य व जेवणाची मोठ्या प्रमाणावर मदत केली. आमटी, भात, शिरा असे पदार्थ गरजूंच्या घरापर्यंत पोहोचवून त्यांनी माणुसकीचे उदाहरण घालून दिले. समाजातील गरीब घटकांना आर्थिक मदत तसेच जीवनावश्यक वस्तू देण्याचे कार्य त्यांनी सातत्याने केले. माणूस किती वर्षे जगला यापेक्षा तो कसा जगला, यालाच खरे जीवन म्हणतात, आणि माधवशेठ यांनी हे वाक्य आपल्या आयुष्यात खऱ्या अर्थाने सिद्ध केले. त्यांचा स्पष्टवक्तेपणा हा त्यांचा खास गुण होता. सत्य मांडण्याची त्यांची वृत्ती समाजात त्यांना वेगळे स्थान देणारी ठरली.

**काळाच्या महिमा काळच जाणे,**
**कठीण तुझे अचानक जाणे**
**आजही घुमतो स्वर तुझा कानी,**
**वाहताना श्रद्धांजली, डोळ्यांत येते पाणी...**

समस्त गोसावी परिवाराच्या वतीने माधव शेठ यांना भावपूर्ण श्रद्धांजली.

संगमनेर तालुका पंचायत समितीचे माजी सदस्य तसेच संजय गांधी निराधार योजनेचे माजी अध्यक्ष

## कै. माधवराव रामभाऊ हासे

यांना ॥ भावपूर्ण श्रध्दांजली ॥

शोकाकूल

**ग्रामपंचायत कार्यालय राजापूर, ता. संगमनेर जि. अहिल्यानगर**

**मा. प्रशासक व सर्व कर्मचारी वृंद,**
**समस्थ ग्रामस्थ राजापूर,**
**ता. संगमनेर, जि. अ.नगर**




INVOFIX

आजच सोलर सिस्टीम लावा व आपले लाईट बिल शुन्य करा

शासनामार्फत मिळणारी सबसिडी

1KW 30,000/- Rupees

2KW 60,000/- Rupees

3KW 78,000/- Rupees

सौर उर्जा आजची गरज.. उद्याची बचत..

उपलब्ध सुविधा
१. बँक लोन सुविधा उपलब्ध
२. विज बिल शुन्य करा
३. मोफत मार्गदर्शन
४. फ्री साईट व्हिजीट
५. एक्स्पर्ट टिम, क्वालिटी वर्क

PM SURYA GHAR

आजच योजनेचा लवकरात लवकर लाभ घ्या व भरघोस सबसिडी मिळवा.

Invofix Solution Pvt. Ltd., स्वागत मंगल कार्यालया समोर, अकोले बायपास रोड, संगमनेर ४२२६०५, जि. अहिल्यानगर.

7030334486 7030334494

# चैतन्य हॉस्पिटल

- अतिदक्षता विभाग
- मधुमेह व हृदयरोग
- दमा व श्वसनाचे विकार
- फुफ्फुसासंबंधी औषधोपचार
- जनरल सर्जरी
- पोटाचे विकार व शस्त्रक्रिया
- किडनी विकार
- मेंदू विकार व शस्त्रक्रिया
- सर्पदंश व विषबाधा
- बालरोग चिकित्सा विभाग
- प्लास्टिक सर्जरी व व्यंगोपचार
- संधीवात व मणके विकार

आपत्कालीन औषधे व उपचार


सर्व कंपनीजच्या कॅशलेस सुविधा उपलब्ध

डॉ. जठार हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर
०२४२५ - २२४७६२, मोबा. ७०३८२७०३८२

अविवाहितांच्या, नवविवाहितांच्या, चाळीशीनंतरच्या स्त्री-पुरूषांच्या तसेच मधुमेही व व्यसनाधिनांच्या

**सेक्स समस्या**

हस्तमैथुनाचे दुष्परिणाम/स्वप्नदोष/धातुपात
शीघ्रपतन/असमाधान/कमजोरी/ शुक्राणुंची कमी
गुप्तरोग/ त्वचारोग/ नपुंसकत्व/ मानसिक नैराश्य



जर्मनमेड होमिओपॅथिक औषधे-शास्त्रोक्त मार्गदर्शन



**डॉ. अभय मुथा** (मनोलैंगिक विकार तज्ञ)
B.H.M.S., M.D.(A.M), M.D.(Acu)., P.G.(SEXOLOGY)
३० वर्षांचा प्रदीर्घ अनुभव (राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त)

अत्याधुनिक मशिनच्या सहाय्याने तपासणी करून औषधोपचार
(प्रत्येक नवीन रूग्णासाठी १ तास वेळ दिला जातो) ऑपॉईंटमेंट आवश्यक
१ लाखांहून अधिक रूग्णांवर यशस्वी उपचार

ISO मानांकन प्राप्त

सेक्स सुपर स्पेशालिटी होमिओपॅथिक क्लिनिक
विनायकनगर, नगर-पुणे रोड, अहिल्यानगर

www.sextreatment.in

94 22 23 90 13

दर्शन टेक्सटाईल मार्केट

मान्सून ऑफर 30% ते 70% डिस्काउंट सेल

सेले नव्हे होलसेल सेल

संपर्क : 8390005001
जाणता राजा मार्ग, आय.डी.बी.आय बँक समोर, संगमनेर - 422605



# कुटे हॉस्पिटल अँड लॅप्रोस्कोपी सेंटर

स्वास्थ्य रक्षणाय् रोग परिमनाय्

| | | | | |
|---|---|---|---|---|
| डॉ. सोनाली प्र. कुटे (M.B.B.S.) | डॉ. प्रदीप भाऊसाहेब कुटे (M.S.) | डॉ. निखील रहांगडाले | डॉ. सुनिल दिघे | डॉ. फैमुद्दीन शेख |
| Physician & Anasthhetist | Laproscopic Surgeon & Endoscopist | Orthosurgeon | Cardiologist | Medicine |

- सर्जरी विभाग
- अतिदक्षता विभाग
- अपघात विभाग
- डायलिसीस विभाग
- सुपर स्पेशालिटी विभाग
- न्यूरोविभाग
- हृदयरोग विभाग
- मेडिसीन विभाग
- अद्ययावत कॅथलॅब
- जॉईंट रिप्लेसमेंट
- स्पाईन सर्जरी
- मॉड्युलर ऑपरेशन थिएटर

सर्व मेडिक्लेम व कॅशलेस सुविधा
पंतप्रधान व महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना
ॲम्ब्युलन्स व २४ तास अत्यावश्यक सेवा
8888882225

४० फुटी डीपी रोड, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर
(०२४२५) २२६६८८, २२६६८६



दैनिक युवावार्ता हे दैनिक, सौ. सुशीला किसन हासे, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्. कॉलेज रोड, संगमनेर–४२२६०५, जि. अ.नगर (महाराष्ट्र) यांनी आनंद प्रिंटर्स, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्.कॉलेज रोड, संगमनेर – ४२२६०५ जि. अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून त्याच ठिकाणी प्रकाशित केले. संपादक सौ. सुशीला किसन हासे, मुद्रक, आनंद प्रिंटर्स, (सुशीला किसन हासे), फोन (०२४२५)२२५१२९. या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक, संचालक सहमत असतीलच असे नाही. (संगमनेर न्यायकक्षेत) Email - dailyyuvavarta@gmail.com, RNI No. MAHMAR/2007/24252 पोस्टाचा परवाना क्रं. BII/RNP/SRP/25/2023-25